
प्रितम साळुंखे
एक ती

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# प्रितम उत्तम साळुंखे

लिखित

कादंबरी

# एक ती

# एक ती

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला

पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

एक ती

लेखक : प्रितम उत्तम साळुंखे
पत्ता - मु आंबेघर तर्फ कुडाळ
ता- जावळी जिल्हा - सातारा
मोबा- 7219798808
ई मेल- salunkhepritam1997@gmail. com
Blog- https://salunkhepritam1997. blogspot. Com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २ जून २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे .

प्रितम उत्तम साळुंखे



मी औषधनिर्माण शास्त्रातील एक पदवीधर आणि एका औषधनिर्मिती कंपनी मध्ये उत्पादन अधिकारी म्हणून कार्यरत.

वाचनाची प्रचंड आवड लहानपणापासूनच होती, ऐतिहासिक,वैचारिक वाचन करतानाच हळू हळू कविता लेखनाची आवड निर्माण झाली. तसे एक लेखक म्हणून हे पहिलंच पुस्तक. येत्या काळात ई- साहित्याच्या माध्यमातून शब्द - गुंफण हा एक कविता संग्रह प्रकाशित करण्याचा मानस आहे.

प्रितम उत्तम साळुंखे

पत्ता - मु आंबेघर तर्फ कुडाळ

ता- जावळी जिल्हा - सातारा

मोबा- 7219798808

ई मेल- salunkhepritam1997@gmail. com

Blog- https://salunkhepritam1997. blogspot. com

माझे हे पुस्तक आई वडील आणि

ज्या मैत्रिणीमुळे हे पुस्तक लिहू शकलो

अश्या आमच्या निखळ मैत्री परी

अर्पण.

.........................................................

प्रेम आणि मैत्री तसं बघितलं तर प्रत्येकच माणसाच्या जीवनाचा अविभाज्य भाग. काही लोक असतात ज्यांना प्रेम मिळतं पण काही लोक असेही असतात की प्रेम ज्यांच्यावरती करावं अशी माणसे भेटून पण त्यांना प्रेम भेटत नाही. मग अश्या वेळी त्यांना सावरते ती एक गोड मैत्रीण.

कथेचा नायक पियूष तसा साधा आणि सरळ मुलगा. अगदीच मितभाषी एक मोठा अधिकारी होण्याचं स्वप्न बाळगणारा पण प्रेमासाठी तेवढाच हळवा. कथेची नायिका राधा ती पण अशीच मितभाषी साधी आणि सोज्वळ मुलगी.

एका अपघातानेच दोघं जवळ येतात आणि राधा पियूषचं जगणंच बनून जाते . दोघांच्या नात्यांच्या वेलीवर मैत्रीच्या कळीच प्रेमाच्या फुलात रूपांतर होण्याआधीच दोघेही दुरावतात. पियूष त्याचं जगणंच हरवून बसतो पण त्या वेळी त्याला सावरते ती त्याची मैत्रीण आदिती. तीच शिकवते त्याला पुन्हा नव्याने जगायला. तर अशी ही कथा आहे एका मैत्रिणीची.

एक ती कधी असते ती एक अबोल प्रेम

तर कधी ती असते एक निखळ मैत्री

कधी ती असते एक अल्लड अवखळ विश्वासाचं नातं

तर ही गोष्ट अशीच आहे एका अबोल प्रेमाची

आणि एका निखळ मैत्रीची

# एक ती

उन्हाळ्याचे दिवस होते. त्या दिवशी पियूष एकटाच घरी होता. भर उन्हाळ्यात आभाळात काळे ढग दाटून आले होते आणि बघता बघता पाऊस पडू लागला

वळीवच तो. स्वच्छंदी मनमुराद बरसणारा. खूप दिवसाच्या विरहाने तापलेल्या मातीला भेटण्याची ओढ असते या पावसात. तापलेल्या मातीचा वास त्या हलक्याच सरींनी वाऱ्यासोबत उधळला तसं पियूषचं मन तिच्या आठवणीत वेडावले त्याने एक कविता पोस्ट केली.

आभाळी नभ दाटून आले
मन वेडे बावरले का
हलकेच पावलांनी
अल्लड सरी परी
तू येना ना पुन्हा पुन्हा
आज पुन्हा उनाड वारा
सांगतो तुझीच आठवण
वेडवणारा मृदगंध
करतो तुझ्या आठवणीची नयनी साठवण
चिंब ओली अल्लड सर ती
भासते तुज परी
येना पुन्ह पुन्ह तू त्याच अल्लड सरी परी"

ती पोस्ट पाहून आदिती ने मेसेज केला...

“पियूष अरे दोन वर्षे होऊन गेली तू अजून या सगळ्यातून बाहेर पडला नाहीस. आता तरी बाहेर पड विसरून जा राधा ला" आदिती

“नाही आदू राधा सोबत नसली म्हणून काय झालं तिच्या आठवणी तर सोबतीला आहेत ना?”

“ओय देवदास तिच्या आठवणीतून कधी बाहेर पडणार आहेस? सगळ करिअर खराब करून घेतलंय तू तिच्यासाठी”आदिती

तिच्या मेसेजला उत्तर देताना त्याने काहीश्या मिश्किल पणे मेसेज केला

“इस कंबक्त यांदो को आप क्या जानोगे ?

ये चीज ही ऐसी ना खुद मिटती हैं न खुद को मीटाने देती हैं !”

अरे बापरे आता शायरी पण चालू केलीस तिच्यासाठी”आदिती

काय करणार वेड प्रेम ना सगळ काही करावं लागतं “पियूष

प्रेम करावं अगदी वेड्यासारखं करावं, जगाचं आणि जगण्याचं भान हरपून पण जिच्यावर प्रेम करतोयस तिला त्याची जाणीव असू दे ?”आदिती

अग यडू तिला माहित आहे म्हणूनच तर ती बोलत नाही ना!

धन्य आहे बाबा तुझी तिला त्रास होईल म्हणून तिच्याशी बोलत नाहीयेस तू पण जरा स्वतःचा विचार कर की तिच्या अबोलपणामुळं तुला किती त्रास होतोय ते. असं किती दिवस तिच्या आठवणीत जगणार आहेस तू?आदिती

जगणं?अग यडू मी तर कधीच मेलोय आता मागे उरलेय ते एक तिच्या आठवणीच्या श्वासावर जगणारे एक जिवंत चालते बोलते प्रेत. ”पियूष

पियूष तिने कॉल नाही केला म्हणून काय झालं? तू एकदा स्वतः कॉल कर”आदिती

नाही आदू ती नाही बोलणार माझ्याशी"पियूष

अरे तिनं एकदा बोलावं एवढ्याच एका हट्टापायी अजून तिच्या आठवणीत अडकून पडलायस तू"आदिती

हे बघ आदू ती माझ्या आयुष्यात पुन्हा येईल ही अपेक्षा तर मी कधीच सोडून दिलीय

पण जिच्यावर एवढं प्रेम केले तिनं एकदा बोलावं हि अपेक्षा पण करू नये का मी? पियूष

मग अजून का त्रास करून घेतोय तिच्यासाठी. ?आदिती

अरे पण आता यातून बाहेर पड जवळ जवळ दोन वर्षे झाली आहेत तिच्या एका कॉल ची वाट बघतोय तु" आदिती

मग काय करू जिच्यावर प्रेम केलं तिला विसरून जाऊ का?पियूष

नाही रे पियूष पण यातून सावर तू स्वतःला माझं मन मला सांगताय ती एक दिवस नक्की कॉल करेल बघ.

पियूष माझ्या डोक्यात एक भन्नाट आयडिया आली बघ"आदिती

काय सुचलं आता या सुपीक डोक्याला?. "पियूष

मन हे बावरे "आठवलं का काही?"आदिती

काय झालं होत?पियूष

अरे बाबा इन्स्टा, आणि फेसबुक, एवढंच काय तर तुझ्या मेल वर किती तरी डूपलिकेट राधा वेड्या झाल्या होत्या तुझ्या कवितांसाठी!आदिती

बरं मग आता त्याचं काय?पियूष

ऐक मग एक काम कर जसं तिच्यासाठी कविता लिहल्यास तशी एक स्टोरी लिही तुझी आणि तिची कदाचित ही स्टोरी वाचून ती नक्की कॉल करेल बघ"आदिती

नाही ग आदू मुळात त्या कविता नाहीतच तिच्याबद्दल ज्या काही अबोल भावना होत्या त्या मि कागदावर उतरवून त्याला शब्द दिले बस एवढेच आणि मी आता त्या कविता वैगेरे सोडून दिलंय सगळ "पियूष काहीसा क्षीण आवाजात बोलत होता.

तुला कश्या मिळाल्या त्या कविता?"पियूष

ओ कवी महाशय जरा तुमचा आठवणीचा खजाना सापडतो का ते बघा"आदिती

म्हणजे मी नाही समजलो "पियूष

पियूष जरा तुझी डायरी बघ रे सापडते का ती?"आदिती

पियूष आता त्याची डायरी शोधू लागला.. त्याची तीच ही डायरी त्याच्या भूतकाळातील आठवणीचा ठेवा होता...

आदिती माझी डायरी तुझ्याकडे आहे का?पियूष

हवं तर समज तसे तू?आदिती

आदू तुला माहित आहे ना तुला मला दुसऱ्या कोणी हात लावलेला नाही आवडत त्या डायरी ला! पियूष

मी कोण पण आहे होय?जरा रागानेच आदिती ने विचारल

अग यडू तसे नाही पण असं वेड्या मुलीसारखं नको करू तू ती डायरी परत दे मला. "पियूष

पियूष तुला डायरी पाहिजे ना मग शहाण्या मुलासारखी तुझी आणि तुझ्या त्या राधा ची स्टोरी लिही आणि मला दे मी काय करायचं ते करते . "आदिती

अग आदिती मला नाही पुन्हा त्या भूतकाळात जायचं...कसा तरी मी तिला विसरायचं प्रयत्न करतोय पण तू आहेस की मला पुन्हा त्या सगळ्यांची आठवण करून देण्यासाठी प्रयत्न करतेयस "पियूष

इतना तो हक हैं मेरा तुझी एकुलती एक मैत्रीण जी आहे आणि ऐक डायरी पाहिजे तर आधी स्टोरी लिही मगच डायरी मिळेल"आदिती

ओके बाबा पण डायरी मला दे"पियूष

एरवी दुसऱ्या कोणी जर त्या डायरीला हात लावलेला त्याला आवडल नसत पण ती डायरी आदिती कडे होती म्हणून पियूष शांत होता.

कारण आदिती होतीच त्याची लहानपणापासूनची मैत्रीण.. अगदी बेस्ट फ्रेंड तिच्याशीच तो सगळ काही शेअर करायचा.

एक दिर्घ श्वास घेऊन पियूष ने कपाटातून राधाची एक फ्रेम काढली.. आणि डोळ्यात नकळत आलेले पाणी पुसून स्टोरी लिहायला सुरुवात केली. "एक ती"त्याच मन भूतकाळात गेलं . बोलतात ना मनाच्या वेगा पुढं सगळेच वेग कमी होतात त्याचा प्रत्यक्ष अनुभव पियूष घेत होता. आता फक्त त्याच्या विचारात एकच होती ती त्याची राधा..

एक तहानलेला माणूस ज्या प्रमाणे पाण्याचा शोध घेतो, तेव्हा त्याची जी अवस्था होते

तीच अवस्था पियूष ची राधाला आठवताना होत होती. पियूष ने तिथून लिहायला सुरुवात केली जिथुन राधा खऱ्या अर्थाने त्याच्या आयुष्यात आली होती.

..............................................

त्या दिवशी नेहमीसारखाच कॉमन ऑफ घेऊन सगळी क्लास मधली मुले मुली घरीच थांबली होती. पण याला अपवाद मात्र पाच जण होते. पियूष त्याच्या स्वभावाप्रमाणेच नेहमीसारखाच कॉलेजला आला होता. त्याच्या सोबतीला नुकतच एडमिशन घेऊन आलेला ज्ञानेश होता. तसं मुळात पियूष एकदम सिन्सियर मुलगा होता. अबोल, मितभाषी, आणि सिन्सियर, इतर मुलांसारखे लेक्चर प्रॅक्टिकल बंक करणे त्याला आवडायचे नाही. त्यामुळे त्या दिवशी देखील तो कॉलेजला आला होता.

त्यात बी फार्मसीचे त्याचे शेवटचे वर्ष आणि त्याची स्पर्धा परीक्षेची तयारी त्यामुळे हे महाशय एक दिवस देखील कॉलेज बुडवत न्हवते. मोठ्या दादा सारखं त्याला पण एक चांगला अधिकारी बनायचं होत.

बराच वेळ वाट बघून पण लेक्चरला इतर कोणही आल न्हवतं. म्हणून मग सी . आर. असल्यामुळे. मग पियूष नेच अटेडन्स घेतला आणि पाटील सर जे की त्याचे क्लास टीचर होते त्यांना दिला.

आणि पाटील सर त्यालाच विचारू लागले बाकी मुले कुठे आहेत म्हणून! पण त्याने काही माहीत नाही एवढेच उत्तर दिले आणि हसत हसत बाहेर आला.

जरा वेळाने पाटील सर पुन्हा पियूषला बोलावून लायब्ररी मध्ये बसायला सांगितले.

बस आता पियूषच्या पोटात गोळा आला.

कारण आता त्याला त्या तिघी सोबत बोलावं लागणार होत. स्नेहा, प्रीती,आणि राधा.

कारण त्या दिवशी या तिघीच कॉलेजला आलेल्या होत्या . या तिघी म्हणजे एकदम वेगळ्या मुली.

क्लास मधील इतर मुलीपेक्षा वेगळ्या हुशार,आणि साध्या, सरळ.

या तिघींची मैत्री तशी ज्युनियर कॉलेज पासूनच होती बारावी झाल्यानंतर पुढे कॉलेजला देखील एकत्र आलेल्या. आणि गंमत अशी की प्रॅक्टिकल ची बॅच देखील एकच.

या तिघींचि मैत्री म्हणजे अगदी अमर अकबर अँथनी टाईप होती.

"राधा आपल्याला लायब्ररी मध्ये बसायला सांगितले आहे" असं काहीस घाबरत घाबरत च पियूष बोलला.

कारण ही तसंच होत कारण कधीच मुलींशी न बोलणारा पियूष आज त्या तिघींसोबत बोलत होता.

काहीस नाराजीनेच त्या तिघी एकत्र बोलल्या "खरच का?

हो म्हणजे हवं तर आपण एकत्र जाऊन सुट्टी मागुया"पियूष

"चला मग आपण जाऊया बघू सुट्टी मिळते का ते?

जाऊया या ना राधा" प्रीती

हा जाऊया की" राधा

पण सुट्टी कोण मागणार? स्नेहा

कोण म्हणजे तुम्हीच मागा ना?पियूष

म्हणजे तू नाही मागणार का?प्रीती

तसं नाही पण मी लायब्ररीत बसणार आहे

तुम्हाला घरी जायचं आहे ना? पियूष

आम्हाला म्हणजे राधाला घरी जायचं होत. "प्रीती

पण मग मागा ना तुम्ही सुट्टी!पियूष

बरं राधा मागेल"स्नेहा

आता ते सगळे लायब्ररी मध्ये जायला निघाले

लायब्ररी जवळ गेल्या नंतर मात्र पुढे कोणच जाईना

एका बाजूला ज्ञानेश त्याच्या बाजुला स्नेहा,प्रीती,राधा आणि पियूष असे थांबले होते.

सगळे जण एकमेकांना खुणावत होते पण पुढे कोणच जात न्हवते.

राधा ने आधी स्नेहा, आणि प्रीतीला सुट्टी मागायला सांगितले पण त्या दोघी तूच माग असं म्हणाल्या.

तेव्हा आता राधाचं आता निघाली होती. पण काही केल्या ती काही आत जात न्हवती. ती घाबरत घाबरत आत जाणार तेवढ्यात

राधा थांब मी विचारतो"पियूष

असे बोलून पियूष आत गेला राधा ने बोलले " थ्यांक्यू पियूष "चे शब्द ऐकून काहीसा हसतच पियूष आत गेला

मे आय कम इन सर?" पियूष

हा ये ये पियूष ! बाकी कोण नाही आले का"?पाटील सर

नाही सर म्हणजे आज कोण नाही येणार !

म्हणजे कॉमन ऑफ ! अरे फायनल इयरला झालय काय सगळे कॉमन ऑफ घेत्यात"डिफॉल्टर ची लिस्ट निघेल मग समजेल त्यांना " पाटील सर

"पियूष तुम्ही किती जण आलंय!?"पाटील सर

सर आम्ही पाच जण आहे!"पियूष

पाच च होय! बरं असू दे असू दे तुम्ही अभ्यास करत बसा!पाटील सर बोलले

पण सर जरा राधाला घरी जायचे होते "पियूष

होय का ? बरं असू दे असुदे त्यांना लंच ब्रेक नंतर घरी जायला सांग" पाटील सर

ओके सर " पियूष

इकडे बाकी चार जण आता पियूष काय सांगतोय याची वाट बघत होते.

"सरांनी अभ्यास करत बसायला सांगितलं आहे"पियूष

म्हणजे सुट्टी नाही होय?"प्रीती

नाही म्हणजे राधाला लंच ब्रेक नंतर जायला सांगितलंय. " पियूष

आणि आम्ही?" स्नेहा

तुम्ही बसा आज इथेच लॅब मध्ये!"पियूष

सगळ्यांचे चेहरे पडले होते.

चला आत जाऊ असे बोलून पियूष लायब्ररी मधे गेला

नाईलाजाने आता त्या तिघी पण आल्या

नेहमी प्रमाणे पियूष त्याच्या ठरलेल्या टेबल वर बसला. त्यांचा टेबल म्हणजे एसआरपी ग्रुप चा टेबल.

सहसा त्या टेबल वर कोण बसत नसे.

आणि कोण बसलाच तर शोएब आणि रोहन त्याला बसू देत नसत .

आता हे दोघे म्हणजे पियूषचे एकदम खास दोस्त अगदी दिलं चाहता है. मधल्या तिघा सारखे

त्या तिघांच्या नाववरून ग्रुप च नाव पडलं होत . SRP

ज्ञानेशला काही तरी काम होते म्हणून तो ऑफिस मध्ये गेला.

आता हा पियूष एकटाच बसला होता.

अगदी समोरच्याच टेबल वर त्या तिघी बसल्या होत्या.

प्रीती आणि स्नेहा चा चेहरा राधा कडे होता पण

राधा चा चेहरा मात्र पियूषला दिसत होता.

नेहमप्रमाणेच पियूष ने त्याच आवडत केमिस्ट्री च पुस्तक घेऊन वाचायला सुरुवात केली.

"पियूष या नोट्स लिहून बाकी मुलांना पण द्या" पाटील सर बोलले.

पियूष मग त्या नोट्स घेऊन त्या तिघी बसलेल्या टेबल कडे गेला.

प्रीती तुम्ही या नोट्स लिहून घ्या आणि मला पण नंतर त्या नोट्स द्या ऐवढे बोलून तो त्याच्या टेबल कडे गेला.

स्नेहा त्याला पण बोलव ना! म्हणजे त्याच्या पण नोट्स लिहून होतील. "राधा

पियूष तू पण लिही ना नोट्स म्हणजे तुझ्या पण लिहून होतील!स्नेहा.

बरं थाबा मी आलो असे बोलून तो त्याच्या टेबल वरून उटून निघाला आणि त्या तिघी बसलेल्या टेबलच्याच शेजारी बसला.

अरे पियूष असा लांब का बसलाय इथे आहे की जागा इथे बस" त्याला असं दुसऱ्या टेबल वर बसलेले बघून स्नेहा बोलली.

नाही ठीक आहे मी" पियूष

अरे बस की इथ " प्रीती

बरं ठीक आहे असं म्हणत पियूष उठला आणि प्रीती आणि स्नेहाच्या शेजारी जाऊन बसला.

त्याला तिथं बसलेले पाहून राधा च हसू लागली

मला घाबरतोस का पियूष ?"राधा

नाही तसं काही नाही " पियूष

अरे मग इथ आहे की जागा शेजारच्या खुर्चीवर हाथ ठेवून राधा बोलली.

हसत हसत पियूष पण तिथून उठला आणि राधाच्या शेजारी जाऊन बसला.

सुरवातीला नोट्स लिहता लीहता यांच्या गप्पा कधी सुरू झाल्या त्या त्यांनाच समजले नाही.

मग तुम्ही जॉब करणार की पोस्ट ग्रॅज्युएशन?पियूष

नाही अजून नक्की नाही ठरलेलं"राधा हसत हसत बोलली.

आता पर्यंत बराच वेळ निघून गेला होता.

लंच ब्रेक कधी झाला ते तिघांना पण समजले नाही.

पाटील सर च येऊन म्हणाले " तुम्ही घरी गेला तरी चालेल". तेव्हा त्या तिघी निघाल्या.

जाताना राधा पियूषला बोलली तू नाही का जाणार

नाही मी इथच थांबणार आहे" पियूष

त्या निघून गेल्या नंतर मात्र पियूष च कशातच लक्ष लागत नव्हत

राहून राहून राधा च त्याला आठवत होती .

तीच लाघवी हास्य, चमकदार डोळे,काहीशी बावरी नजर.

आज एवढ्या दिवसात कुठल्या तरी मुलीशी मन मोकळे पणे बोलला होता तो.

काहीसा गालातल्या गालात हसतच पियूष त्या तिथे विसरलेल्या पेन कडे बघत होता.

राधा गडबडीत तिचे पेन विसरून गेली होती.

त्या दिवशी पियूष घरी आला. पण त्याच लक्ष कशातच लागत नव्हतं राहून राहून त्याला फक्त राधाचं आठवत होती. कशातच लक्ष लागत नव्हतं कधी एकदा उद्या कॉलेजला जातो आणि राधा दिसतेय असं त्याला झाल होत. रात्री जेवण केल्या नंतर पण लवकर झोपला नाही. फक्त त्याला राधाचं आठवत होती. तिचा हसरा चेहरा,साधी सरळ वेणी आणि आणि नावाला साजेस लाघवी हास्य. राधा. खरच या नावातच मोहिनी होती.

आज बऱ्याच दिवसांनी पियूष ने त्याची डायरी लिहायला घेतली.

“आज चा दिवस खरच माझ्या आयुष्यात महत्वाचा दिवस आहे.. शेवटी मला ती भेटलीच जिला मी शोधत होतो.. ज्या प्रमाणे तापलेली जमीन तापून झाल्यानंतर, पावसाची वाट पाहते, चातक पक्षी ज्या प्रमाणे पाण्याची वाट बघतो त्याच प्रमाणे मी तिची वाट बघितली...राधा खरच नावा सारखीच आहे ती. पण ही राधा माझं स्वप्न होती कदाचित हे स्वप्न,स्वप्न तर नाही ना राहणार.

दुसऱ्यादिवशी पियूष नेहमी प्रमाणे कॉलेजला गेला . आज सगळजन कॉलेज का आले होते.

रोहन आणि शोएब पण आज आले होते .

आज नेहमी प्रमाणे जेव्हा पियूष पेपर वाचायला निघाला होता. तेव्हा त्याला राधा दिसली.

आज स्वतःहून तो राधाला गुड मॉर्निंग बोलला. ति देखील हसत हसत त्याला गुड मॉर्निंग बोलली.

हे बघून मात्र रोहन आणि शोएबला मात्र पियूषच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य बघून हसायला येत होते.

त्याची चोरी पकडली होती.

शोएब आणि रोहन त्याला राधाबद्दल विचारत होते.

पण पियूष ने तसे काही नाही एवढंच बोलला.

गप रे तुला मी ओळखत नाही का?शोएब

का काय झालं?पियूष

अरे आपली डिग्री संपत आली फक्त दोन महिने उरलेत एवढ्या दिवसात कुठल्या मुलीशी बोलला होतास का?रोहन

नाही मग त्याचा राधाशी काय संबंध?पियूष

अरे बाबा राधाला लाईक करतो का तू?रोहन

तसे काही नाही ती फक्त एक चांगली मुलगी आहे बस ऐवढच!"पियूष बोलला

बरं असुदे असुदे !शोएब

आणि दोघे पण हसायला लागले.

लेक्चर सुरू झाली होती पण पियूष च मात्र लक्ष लागतच न्हवत . सतत त्याची नजर फक्त राधा लाच शोधत होती.

लेक्चर संपल्यानंतर पाणी प्यायला जेव्हा पियूष बाहेर गेला तेव्हा त्याला कॉरिडॉर मधे राधा दिसली. तेव्हा नकळत पणे दोघांच्या ही चेहऱ्यावर एक स्मित हास्य उमटले. बस एवढंच रोहन ने नोटीस केलं.

आणि शोएबला खूनवल. आणि दोघे पण हसू लागले.

तोपर्यंत इकडे दुसरे लेक्चर चालू झाले होते.

घाई गडबडीत ते तिघे पण लेक्चरला आले.

लंच ब्रेक नंतर सगळे जेवत होते. पण पियूष ची नजर मात्र राधाला शोधत होती. कुठे राधा दिसतेय का बघत होती ही त्याची तडफड बघून मात्र आता दोघे पण हसत होते तेवढ्यात शोएब ने "दो दिल मिल रहे हैं मगर चुपके चूपके "हे गाणं म्हणायला सुरुवात केली.

अरे बाबा असं काही नाहीये ती फक्त एक चांगली मुलगी आहे म्हणून मी तिच्याशी बोलतो. "पियूष

मग मी कुठ म्हणतोय बोलू नको" रोहन

मग विनाकारण कशाला गोंधळ करताय!पियूष

आता त्या राधासाठी आमच्या सोबत बोलणार नाहीस का?रोहन

अरे तसे काही नाही पण उगाच तुम्ही नाही ते कशाला बोलता?पियूष

अरे बाबा नाही काही आम्ही बोलत. "शोएब

बरं जाऊ दे तुला ऑफ आहे आज आम्हाला जाऊ दे

बरं घरी जाताना सोबत जाऊया . एवढं बोलून रोहन गेला.

बरं चल आता जाऊया आपण" पियूष

नाही तू जा प्रॅक्टिकलला मी नाही येणार"शोएब

अरे चल की " पियूष बोलला

अरे जा तू मला घरी जायचंय!!शोएब बोलला

बरं मी जातो म्हणून पियूष प्रॅक्टिकलला गेला.

आज सुध्दा प्रॅक्टिकल जास्त कोणी न्हवते

नेहमीची ग्रुप मेंबर नसल्याने आज पियूषला दुसऱ्या ग्रुप सोबत प्रॅक्टिकल करावे लागत होत.

सरांनी दोघा दोघांच्या ग्रुप मध्ये प्रॅक्टिकल करायला सांगितलं होत. आणि नशिबाने पियूष सोबत राधाचं प्रॅक्टिकल करणार होती.

नेहमीच अवघडल्या सारखे बोलणारे आज मनमोकळेपणे एकमेकांशी बोलत होते.

ही गोष्ट आता पर्यंत अनघाच्या लक्षात आली होती. पियूष ची खरी गंमत तर आता येत होती कारण त्या प्रॅक्टिकलला ॲसिड वापरायचे होते. पण काही केल्या पियूष राधाला ॲसिड हँडेल करू देत न्हवता. प्रॅक्टिकल झाल्या नंतर मोकल्यावेळेत बोलत होते. पण तरी पण ते पेन मात्र काही पियूष ने राधाला दिले नाही.

अनघा आता मुद्दाम त्या दोघांशी बोलत होती पण आपल्या व्यतिरिक्त अनघा देखील इथे आहे हे पियूष विसरून गेला होता.

असेच दिवसां मागून दिवस जात होते . आता पियूषला जणू काही राधा ची सवय च होऊन गेली होती. ती क्लास मध्ये दिसली नाही तरी पियूष वेडा पिसा होत होता. पियूष कदचित राधाला लाईक करतोय हे आता पर्यंत त्यांच्या ग्रुपच्या लक्षात आले होते.

शेवटी न राहवून अनघा नेच त्याला विचारले पिउश मला जरा बोलायचय तुझ्याशी

हा बोल ना! मला बहीण पण बोलतोस आणि मैत्रीण पण बरोबर ना?

हो ! म्हणजे तुला काय शंका आहे का?पियूष

अरे तसे नाही मग मी विचारते त्या प्रश्नाचं उत्तर खर खर देशील का? अनघा

हो? विचार की"पिऊष

तू कोणला लाईक करतोयस का?

नाही. का रे काय झालं?" पिऊश

काही नाही तुझ टार्गेट लक्षात आहे ना तुझ्या?"अनघा

हो र अनघा दीदी"पियूष हसायला लागला.

तसं बघतील तर अनघा,प्रेरणा,आणि मिरा या तिघी पण पियूषच्याच छान मैत्रीण होत्या पण पियूष पण त्याची बहिणी सारखी च काळजी घ्यायचा.

छान चोकोणी ग्रुप होता त्यांचा

हल्ली पियूष राधाशी रोज बोलण्याचा प्रयत्न करत होता. कधी नोट्स,कधी जर्नल्स,तर कधी प्रॅक्टिकल असं काही ना काही कारण काढून नेहमीच तो तिच्याशी बोलायचा.

आणि कदचित हे राधाला आणि तिच्या मैत्रीण असलेल्या प्रीती आणि स्नेहाच्या लक्षात आले होते.

कारण पियूष राधाशी बोलायला लागला की या दोघी हसत होत्या.

असेच दिवस जात होते.

एक दिवस पियूष ने आदितीला मेसेज केला . आदिती त्याची लहान पानापासून ची बेस्ट फ्रेंड होती.

जीवन गाणे तुझे आनंदाच्या सुरांनी गावे

आयुष्याच्या वेलीवर फक्त सुंदर फुलानीच फुलावे

निरभ्र चांदण्यापरी

आयुष्य तुझे आनंदाने उजळावे.

राधेच्tया सोन पावलांनी

हलकेच स्वप्नांनी तुझ्या उमलून

जीवनाच्या वाटेवर तुला पावलोपावली आनंद मिळावा

आयुष्याचा समुद्र तुझा सोनेरी लाटांनी

भरावा

पावलोपावली तुला सुखाची मिळावी

दुःखाची चाहूलही तुला कधी न मिळावी

जीवन तुझे सुखाच्या सप्तरंगात रंगून जावे

असे हे सोनेरी दिवस जात

फिरुनी पुन्हा यावे...

आदिती ही कविता कशी आहे ते सांग"

अरे छान आहे

मी लिहिलय" पियूष

माझ्यासाठी होय. "आदिती

नाही ग यडू आहे कोणी तरी तिच्यासाठी लिहिलय

एक स्याड वला ईमोजी आदिती ने पाठवला

अरे याडू माझ्यासाठी तु नेहमीच स्पेशल होतीस आणि असणार आहेस. "पियूष

अरे हो रे बाबा पण जिच्यासाठी लिहिलय ती समजून घेईल ना?",आदिती

अरे हो ना यडू तीच तर मला भीती वाटतेय . "

अरे पण तीच नाव तरी सांग"आदिती

ह्या कवितेत आहे नीट वाच"पियूष

राधा?बरोबर ना?

हो!राधा!

किती छान नाव आहे तीच"आदिती

अरे नाव काय राधाचं आहे तशी

जिला मी शोधत होतो अगदी तशीच

साधी सरळ आणि सोज्वळ

तिच्या साधेपणा तच तीच सौंदर्य आहे"

ओ कवी महशाय तुमच्या राधेला कविता ऐकावा!

बरं बाबा!

अरे पियूष पण खरच गोड असले ती राधा तू ऐवढे सांगतोय म्हटल्यावर आणि लकी आहे बघ ती

तिच्यासाठी एवढी छान कविता लिहिली आहेस तू. "आदिती

नाही आदिती,लकी ती नाही लकी मी आहे

कारण जिला मी शोधत होतो ती एकदाची भेटली मला

पण माहित नाही नशीबा मध्ये आहे का नाही ते?पियूष

ओय पागल असं का बोलतोयस?"

अरे बघ की एका क्लासमध्ये असून मी तिच्याशी बोललो न्हवतो आणि कॉलेज संपायला फक्त दोन महिने राहिलेत !"पियूष

अरे बस एवढेच ना मग तुझ्या मनात काय आहे ते सांग तीला?"आदिती

तसं नाही आदु पण मला भीती वाटतेय मी तिला गमावून बसेल याची!पियूष

वेडा कुठला जर एवढंच वाटतयं तर जरा वेळ घे आणि मग सांग तिला पण तुला एक सांगू का जसं प्रेमात पडायला एक क्षण पुरेसा असतो तसेच समोरच्याच असणारे प्रेम समजायला देखील एक क्षण पुरेसा असतो. "आदिती

बरं आता झोप आणि विश कर तिला उद्या"आदिती

उद्या राधाला वाढदिवसाच्या शुभेच्छा द्यायच्या या कल्पनेने च पियूषला झोप येत नव्हती.

शेवटी कधी त्याला झोप लागली तेच त्याला समजली नाही. त्याने लीहलेली एक कविता आणि लायब्ररी मधे विसरलेले राधाचं पेन तसंच त्याच्या जवळ होता.

सकाळी पीयूष लवकरच कॉलेजला गेला होता.

कॉलेजला गेल्या पासून पियूष ची नजर फकत आणि फकत राधाला च शोधत होती.

एकदाची राधा त्याला दिसली.

आता फकत पियूष लेक्चर संपण्याची वाट बघत होता. शेवटी लेक्चर संपले तेव्हा पियूष ने जाऊन राधाला विश केले. हसत हसत राधा ने पण thanks बोलली.

त्या दिवशी पियूष ने प्लॅन केल्या प्रमाणे राधा चां वाढदिवस सेलिब्रेट करता नाही येणार म्हणून पियूष जरा नाराज होता. कारण दुसऱ्याच दिवशी एनएसएस चा कॅम्प सुरू होणार होता. त्यामुळे त्याच्या तयारी करिता लवकर सुट्टी होणार होती.

घरी आल्यावर पण पियूषच्याच डोक्यात तीच कविता होती जी की खूप प्रयत्न करून देखील तिला सांगू,शकला नाही.

कॅम्पचे दिवस मात्र अत्यंत अविस्मरणीय अशेच गेले होते.

जेवताना पियूष काळजीने राधाला काही हवे की नको ते विचारत होता. तेव्हा मात्र अनघाला हसू येत होते.

आता शेवटच्या दिवशी गाण्याच्या भेंड्या खेळत होते त्या दिवशी पियूषने मुद्दाम हून

दरदे दिलं दरदे जिगर दिलं मे जगाया आपणे

पहले तो मैं शायर न था शायर बनाया अपणे

हे गाणं म्हणत होता.

तेव्हा शोएब आणि रोहन शायर शायर म्हणून त्याला चिडवू लागले.

पियूष अश्याच कॅम्पच्या गोड आठवणी मनात साठवत होता.

कॅम्प वरून घरी आल्या नंतर मात्र पियूषला उदास वाटत होत. परवा पासून त्यांची सेशनल एक्झाम चालू होणार होती आणि त्या नंतर सबमिशन चालू होणार होते. सबमीशन म्हणजे त्यांच्या कॉलेज लाईफ चा शेवट कारण त्यानंतर डायरेक्ट सगळे जण भेटणार ते प्रॅक्टिकल एक्साम ला.

रात्र भर पिउष फकत राधाचाच विचार करत होता. मनातून खूप भिला होता की राधा एक स्वप्न होत. आणि ते स्वप्न तर नाही ना राहणार.

त्याने त्याच्या बॅगेतून राधा च पेन,तिची एक पट्टी जी की त्याने प्रॅक्टिकल लॅब मधून मोठ्या शिताफीने मिळवली होती ती काढून बसला होता.

फोनच्या गॅलरी मधे तो राधाचा आणि त्याचा फोटो बघत होता. ग्यादरिंगच्या दिवशी त्याने स्वतःहून फोटो काढला होता राधा सोबत. आणि अती उत्साही पणात राधाला काय मी माझ्या बेस्ट फ्रेंड सोबत फोटो काढू शकतो का?असे विचारल होत. तो क्षण पियूष ने खोल हुदयात साठवून ठेवला होता. त्या क्षणी राधाचं हसन त्याला आठवत होत. त्या क्षणाला कदचित राधा पण थोडी दचकलीच होती. कदाचित राधासाठी पियूषचे सेल्फी विचारणे जेवढे अनपेक्षित होते कदाचित कितीतरी पटीने अपेक्षित होते.

राधाचं त्याच्याशी पाहिलं बोलणं,तिला कॉरिडॉर मधे वुमेन्स डे दिवशी केलेले विश,तिच्यासाठी बनवलेली कविता,तिचा पेन,तिची पट्टी असं सगळ काही त्याला आठवत होत.

परवा पासून त्यांची एक्साम् सुरू होणार होती म्हणून त्याने आता अभ्यासावर लक्ष केंद्रित केले होते.

एक्सामंच्या दिवशी पण राधाला बेस्ट लक दिल्याशिवाय पियूष आत मध्ये जात न्हवता. पेपर संपल्यानतर पियूष ने राधाला पेपर कसा गेला विचारल

छान होता"राधा

ऐक ना मला जरा तुझ्याशी बोलायचय "पियूष

हा बोलणा"राधा

ऐक तुझ्यासोबत फोटो काढला याचा तुला राग आला नाही ना?"पियूष ने काहीस घाबरतच विचारल.

नाही रे"राधा ने हसत हसत उत्तर दिले.

या उत्तराने मात्र पियूषला अगदी आभाळ ठेंगणं झालं

बघता बघता सेशनल एक्झामं पण संपली.

प्रोजेक्ट सबमिशन चालू होते राधा आणि पियूष दोघे पण एकाच ग्रुप मधे होते. त्या दिवशी अनघा आणि पियूष दोघे प्रोजेक्टसाठी कॅफेत गेले. पण राधा ची प्रोजेक्ट ची काहीच तयारी न्हवाती.

म्हणून मग अनघाला पियूष ने सांगितलं की राधाला प्रोजेक्टसाठी बोलावं. राधा पण निघाली होती.

काय झालं अनघा ? राधा येतेय ना?"पियूष

हो र बाबा येतेय ती!

शेवटी एकदाची राधा आली.

पियूष तिचीच वाट बघत होता.

तसं पण अनघा चाा प्रोजेक्ट बनवून झाला होता.

मग पियूषला प्रायव्हसी भेटवी म्हणून मग अनघा तेथून गेली..

कॅफे त मात्र आता पियूष मनमोकळे पणे तिच्याशी बोलत होता. सोबतीला प्रीती आहे हे पण पियूष विसरून गेला होता. शेवटी झाला एकदा त्यांचा प्रोजेक्ट. पण बराच उशीर झाला होता.

कसे तरी ते बस स्टँडला गेले.

राधा मी बस ची चौकशी करून येतो. तुम्ही थांबा इथेच "पियूष

थांब ना आम्ही पण येतो. "राधा

नको नको तूच जा"प्रीती हसत हसत बोलली. हे मात्र पियूष ने हेरले होते.

राधा सुध्दा हसत हसत त्याच्या सोबत गेली.

तो क्षण खरच पियूषसाठी अविस्मरणीय होता.

तेवढ्यात त्यांची बस आली.

राधा,प्रीती बस मध्ये बसल्या. तेव्हा खिडकीतून च पियूष राधा सोबत बोलत होता

घरी पोहचलीस की फोन कर!

राधा ने सुध्दा मानेने हो बोलत होती.

त्या रात्री घरी पोहचल्या नंतर राधा ने आठवणीने फोन केला होता. अजून पण पियूष घरी पोहचला न्हवता.

तिचा पहिला फोन कॉल त्याने तिची आठवण म्हणून तो कॉल रेकॉर्ड केला .

असेच सबमिशन पण झाले. आत्ता मात्र पियूष ची अस्वस्थता वाढत होती. कारण आत्ता त्याला राधा भेटणार नहवती .

असेच दिवस जात होते. प्रॅक्टिकल एक्झांम सुरू झालेल्या होत्या . पियूष आणि राधा दोघांचे पण एकच बॅच होती.

शेवटच्या प्रॅक्टिकल दिवशी पियूष ने अनघाला सगळं काही सांगायचं ठरवलं.

अनघा जरां मला बोलायचं होत.

हा बोल की!"पियूष

एक मुलगी आहे मला तिची सारखी काळजी वाटते,सारखं तिच्याशी बोलावं वाटत, ती दिसली नाही तर मन कसं घाबरून जात.

ही आमची मैत्री आहे की आणखी काही मला खरचं महित नाही. पण मला तिला गमवयच नाहीये,एक मैत्रीण मला वाट दांखवणारी वाटाड्या,आणि एक तत्वज्ञ म्हणून मला ती माझ्या आयुष्यात पाहिजे.

सांग ना मी काय करू ? मला जे काही वाटत ते तीलां सांगू का? पण तिला कायमची गमावून बसेन याची भीती वाटेत य. "पियूष

ती मुलगी राधा ना?अनघा

हो पण तुला कसं समजल?पियूष

चेहऱ्यावरून समजतं सगळं"अनघा

ऐक ना काय करू सांगू का तिला ?पियूष

हे बघ मी तुला उघच खोट्या भ्रमात नाहीये ठेवत पण राधा हे प्रेम वैगेरे या पासून खरच लांब आहे. सो जे काही करशील ते विचारपूर्वक कर. कारण भविष्याचा प्रश्न असणार आहे. सो बी केअरफुल"अनघा

हे ऐकुन मात्र पियूष हसू लागला.

"अनघा ती मला भेटली यातच सगळ काही आहे.

आणि तसं पण मी तिला प्रपोज करणार नाही. कारण एक मैत्रीण म्हणून जरी ति माझ्या आयुष्यात राहिली ना तरी माझ्यासाठी खूप आहे. मला माहित नाही तिच्याशी माझं नक्की कोणते नात असेल पण एक नक्की आहे की काही तरी नात मात्र असेल. एवढं बोलून पियूष ने डोळ्यातील अश्रूला वाट करून दिली.

काय रे हे तू रडतोय?"अनघा

त्याला गप्प बसलेला बघून अनघा हसू लागली

पियूष ती खरच लकी तिची काळजी करायला तू आहेस. इतकी काळजी आणि असं डेडिकेशन या वयात नाही रे कोण दाखवत . कदाचित काही मुलं फकत या वयात फक्त एक टाइमपास म्हणून या सगळया गोष्टी करतात. पण मला माहित आहे तुझ किती प्रेम आहे राधा वरती,तिची किती काळजी घेतोय ते अरे माहित आहे . ती नक्की भेटेल तुला.

कॅम्पस इंटरव्ह्यूला पण फकट तू तिच्यासाठीच आला होतास ना?अरे हे सगळ्यांना माहीत आहे.

..............................

. शेवटच्या दिवशी धरणावर पार्टी करायची असं सगळ्यांनी ठरवलं. सुरुवातीला पियूष जाणार नहवता पण राधा येणार आहे हे समजल्यावर मात्र पियूष पण जायला तयार झाला.

तो दिवस पण पियूष ने खोल ह्रुदयात साठवून ठेवला.

जेवताना पण राधा आणि पियूष शेजारी शेजारी जेवायला बसले होते.

असेच दिवस जात होते पियूष नेहमी न चुकवत राधा पण रिप्लाय द्यायची.

तिचा रिप्लाय बघून तेवढीच त्याच्या मनाची घालमेल कमी होत होती.

असेच दिवस गेले

आणि त्यांची फायनल एक्झांम सुरू झाली होती.

आता फकत काही दिवस च राधाला भेटतात येणार म्हणून पियूष सतत बैचेन होत होता. या पण दिवसात पियूष राधा सोबत घालवलेल्या एका एका क्षणाला मनात साठवून ठेवत होता.

असेच पेपर संपले.

शेवटच्या दिवशी प्रत्येक जन आपापल्या परीने हा दिवस अविस्मरणीय बनवत होता.

नकळत पणे पियूष मनातल्या मनात रडत होता.

त्याची अवस्था फक्त अनघा समजून घेत होती

पियूष आज बोल तिच्याशी .

नको अनघा कदचित मी तिला कायमच हरवून बसेल . अरे मग असा किती दिवस घुसमट करून घेणार?

कदाचित आयुष्यभर!

शेवटी सगळ्यांना भेटल्या नंतर पियूष राधाला भेटला.

राधा मला विसरणार नाहीस ना?पियूष

नाही रे तुला कसं विसरीन मी!राधा

एवढं बोलून राधा जाऊ लागली.

राधा मला एक प्रॉमिस कर "पियूष

कसल प्रॉमिस पियूश हेच की तू कधी विसरणार नाहीस?नाही ना विसरणार"

नाही विसरणार!"राधा

ऐक ना जर मोबाईल नंबर चेंज केलास तर मग सांग मला"हो नक्की सांगेन

तू पण सांग"राधा.

राधा निघून गेली तरी अजूनही पियूष तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत होता.

पियूष काय झालं?तू रडतोय का?"अनघा

काही नाही कुठ काय!पियूष

अरे बाळा अजून लहान आहेस तू !डोळे बघ की"अनघा

अग काही नाही जरा डोळ्यात धूळ गेलीय"पियूष

हो का!बर राधाला मनातलं सगळ काही सांगितलं का!

नाही बोललो !पियूष

अरे वेडा कुठला का नाही बोलला तू?"अनघा

अग राधा सगळया मुलींपेक्षा वेगळी आहे. जर तिला हे आवडल नाही तर तिला कायमचा गमवून बसेन. "पियूष

ऐक पियूष कॉलेज संपलय आता,वेळी च यातून बाहेर पड. तुझ्या पुढं तुझ करिअर आहे त्याचा विचार कर. "अनघा

कसं विसरू तिला फक्त तीन महिन्यांत तिची इतकी सवय झाली की तिच्या शिवाय जगन मी इमॅजिन करूच शकत नाही. आणि तसं पण ते चॅटिंग खर प्रेम नसत. आणि आमच्यात काय नात आहे,यापेक्षा काही तरी नात आहे यात मी समाधानी आहे. एक मैत्रीण म्हणून जरी माझ्या आयुष्यात राहिली तरी मी समाधानी आहे. फक्त तिनं समजून घेतले पाहिजे... "पियूष

..................................

त्या रात्री घरी आल्यानंतर पियूष ने एक कविता लीहली होती ती त्याने व्हॉट्स अप स्टेटस्ला पोस्ट केली.

जीवनाच्या वाटेवर काही

अनोळखी माणसे भेटतात

माहित नाही ती आपली

सवय कधी बनून जातात

वाऱ्यचे झुळकी प्रमाणे येतात

पण जन्मभरासाठी मात्र

आठवणी मागे ठेवून जातात

तशी ती आपली कधीच नसतात

तरी पण ती आपल्याला आठवतात

कारण त्यांच्या आठवणीच्या पाऊलखुणा

मनात खोलवर उमटलेल्या असतात.

राधा ने त्याच स्टेटस् पाहिलं आणि,👌 रिप्लाय दिला.

थॅन्क्स राधा. "पियूष

गुड नाईट पियूष"राधा

त्या रात्री पियूषला झोप च येत न्हवती

त्याला कॉलेजचे दिवस आठवत होते. आणि त्याने ज्या काही आठवणी मनात साठवल्या होत्या. त्या तो आठवत होता. तीच प्रॅक्टिकल लॅब मध्ये भेटणे.,तिच्याशी बोलताना होणारा गोंधळ, बऱ्याच द लेक्चर मधे नजर चोरून बघताना त्याची तिनं पकडलेली चोरी हे सगळ काही आठवत होता. मग त्याने त्याची डायरी काडली त्यात त्याने एक कविता लिहली आणि तीच कविता त्याने राधा ल सेंड केली

एक मैत्रीण असावी

आपल्या एकटेपणात साथ देणारी

वाऱ्यची झुळूक बनून येणारी

रणरणत्या उन्हात अल्लड पणे मनाला गारवा

देऊन जाणारी

एक मैत्रीण असावी

कधी चुक लो तर चुक दाखवणारी

पण चुक दुरुस्त करणारी

एक मैत्रीण असावी

मला जगण्याची नवी उमेद देणारी

माझा जगण्याचा श्वास बनून जाणारी

शेवटी एक मैत्रीण असावी

अंधाऱ्या वाटेतून दिव्या प्रमणे उजेड दाखवणारी

एक मैत्रीण असावी..

दुसऱ्या दिवशी राधाला पियूष ने गुड मॉर्निंग म्हणून मेसेज केला .

गुड मॉर्निंग "राधा

कविता आवडली का?पियूष

हो छान आहे " राधा

एका मित्राने एका मैत्रिणीसाठी लिहिलं आहे. "पियूष

हो का! लिहिले असेल कोणी तरी"राधा

राधा मी लिहिलीय कविता !पियूष

छान आहे की!राधा

खरच की असच!पियूष

अरे खरच कीपियूष तुला एवढं कसं छान कविता लिहायला जमतात. "

अरे सोप असत एखाद्याबद्दल मनात ज्या भावना असतात त्यांना फक्त शब्दांचा आधार द्यायचा मग बनते कविता"पियूष

तुला राग येणार नसेल तर एक विचारू का?राधा

हा बोल की" पियूष

पियूष मी फक्त एक चांगला मित्र म्हणून तुझ्याशी बोलते,प्लीज काही गैरसमज करून घेऊ नको" राधा

नाही ग राधा मी पण एक चांगली मैत्रीण म्हणूनच तुझ्याशी बोलतो. बाकी काही नाही!

काय झालं राधा ?आज अचानक असे का विचारल तू?"पियूष

अरे काही नाही तुझी कविता दादा ने सकाळी वाचली

आणि मग तुझ्याबद्दल विचारत होता. "राधा

मग काय दादा ओरडला होय? राधा आया एम सॉरी . "पियूष

नाही रे फक्त विचारत होता की कोण आहे मुलगा म्हणून?"राधा

मग काय सांगितलं " पियूष

सांगितलं माझा एक चांगला मित्र आहे बोलले"राधा

अरे फोन लॉक नसतो का तुझा?"पियूष

अरे नाही मला नाही लागत गरज त्याची"राधा

बरं दादाला सॉरी सांग"पियूष

ओके बाय! राधा

बाय राधा टेक केअर!"पियूष

..................................

असेच दिवसामागून दिवस जात होते पियूष न चुकता राधाला मेसेज करत होता.

असेच काही दिवस झाले आणि त्यांचा निकाल लागला.

आता जॉबसाठी सगळेच जन ट्राय करत होते.

पियूष सुध्दा गोव्याला गेला. तिथे जॉबसाठी बरीच ट्राय करत होता. पण हवा तसा जॉब भेटत न्हवाता.

गोव्यात असताना पण पियूष न चुकता राधाला मेसेज करायचा.

हाय राधा कशी आहेस? जॉब भेटला का?पियूष

नाही! तू कसा आहेस आणि कुठे आहेस?राधा

अग मी गोव्यात आहे मला प्रोडक्शनला जॉब हवंय पण अजून पाहजे तसा जॉब भेटला नाही. "पियूष

डोन्ट वरी पियूष भेटेल चांगला जॉब!

बाय". राधा

बाय राधा टेक केअर"पियूष

जुलै महिना होता त्यामुळे बाहेर खूप पाऊस पडत होता.

काल राधासाठी एक घेतलेली अंगठी पाहत पाहत पियूष बसला होता. बाहेर पाऊस पडत होता. आणि आत पियूष भिजत होता. भिजत होता तो फकत राधाच्या आठवणीत...

राधा ची खूप आठवण येत होती त्याला.

ती अंगठी त्याने राधासाठी घेतली होती पण खरच त्याला माहीत नहवत कि राधा त्याला भेटेल की नाही ते..

आज एकटाच होता तो घरी ...

मग त्याने नेहमी सारखी डायरी काढली आणि

राधासाठी कविता लिहू लागला.

कसं सांगू मी तुला

तू माझ्यासाठी कोण आहेस

माझं हसणं तू

माझं जगणं तू

माझा ध्यास तू

माझा श्वास तू

कसं सांगू मी तुला

तू माझ्यासाठी कोण आहेस

मला साखर झोपेत पडलेले

एक गोड स्वप्न तू

पहाटेची अल्लड झुळूक

तूमाझ्या चंद्र तू

माझ्या सफेद आयुष्यात

रंग भरणार तू इंद्रधनुष्य आहेस..

कसं सांगू मी तुला

तू माझ्यासाठी कोण आहेस..

कोणाची तरी काळजी करायला

शिकवणाऱ्या काळजीच कारण तू

माझ्या पहिल्या कवितेची पहिली ओळ तू

माझ्या जगण्याचा श्वास...

आणि जगताना लागलेला ध्यास आहेस...

कसं सांगू मी तुला

तू माझ्यासाठी कोण आहेस...

कधी न पूर्ण होणार स्वप्न आहेस की

कोणत्या नावाची गरज नसलेलं नात आहेस

. पण ही कविता पियूष ने तिला सांगितली नाही..

..................................

एके दिवशी टीसीएस सारख्या मोठ्या कंपनीची जाहिरात प्रसिद्ध झाली होती . वॉक इन इंटरव्ह्यू होणार होते..

आणि तसं पण राधाला सुध्दा आयटी मधेच जॉब करायचा आहे हे पियूषला माहित होत.

त्याच दिवशी संध्याकाळी त्याने राधाला मेसेज केला..

हाय राधा!कशी आहेस ? आणि जॉब ?"पियूष

मी ठीक आहे ?तू?"राधा

मी पण मस्त !ऐक की टीसीए ससाठी तरी ट्राय करणार का नाही!?"पियूष

हा करणार आहे की !राधा

वॉक इन आहे 11 तारखेला"तू येणार आहेस का?पियूष

हो पण अजून मी Registration केलेले नाही. "राधा

ऐक ना मग मी करतो मला तुझा इमेल आयडी दे"पियूष

नको दादा करणार आहे"राधा

ओके बाय अँड टेक केअर राधा!पियूष

टेक केअर पियूष!

पियूष ने घरात सांगितलं मी मुंबईला जातोय इंटरव्ह्यूसाठी.

मुळात पियूष फक्त राधाला भेटता यावे म्हणूनच जात होता.

फकत राधाला भेटता यावं म्हणून...

इंटरव्ह्यूच्या दिवशी सकाळपासून संध्याकाळपर्यंत पियूष ने राधाची वाट बघितली पण राधा आलीच नाही. क्लास मधील दुसऱ्या मुली भेटल्या की वेड्यासारखं पियूष विचारत होता. राधा आलीय का ती

संध्याकाळी पियूष ने मेसेज केला.

हाय राधा! हाऊ आर यू!पियूष

मी मस्त आणि तू!राधा

मस्त ऐक की इंटरव्ह्यूला का आली नाहीस!पियूष

अरे मी राहते तिथून खूप लांब आहे ते जॉब लोकेशन.

म्हणून मग नाही आले. " राधा..

बरं जाऊ दे मग दुसरी कडे कुठे ट्राय करणार की नाही?पियूष

हो करणार की!राधा

ऐक की राधा माझं ऐकशील तरआयटी सोडून दुसर काही तरी ट्राय कर.. !पियूष

का रे का काय झालं?राधा

काही नाही. !

असच काळजी वाटते म्हणून म्हणलो. " पियूष

ओके"राधा

बाय राधा अँड टेक केअर...

... असेच दिवस जात होते शेवटी पियूषला जॉब भेटला त्याला हवा तसा...

हॅलो राधा मला जॉब भेटला!पियूष

Congrtulation पियुष ! राधा

राधा तुझ काय झालं तुला भेटला का जॉब?पियूष

नाही रे अजून एका ठिकाणी गेले होते इंटरव्ह्यूला पण अजून वेटींग वर आहे!राधा

डोन्ट वरी राधा भेटेल तुला पण जॉब!पियूष

दोन दिवसांनी पियूष ने राधाला कॉल केला

हॅलो राधा ! कशी आहेस

मी मस्त आहे तू कसा आहेस!? " राधा

मी पण मस्त! ऐक ना qc / QA ला. जॉब करशील का?पियूष

हो असेल तर करीन!राधा

ऐक ना राधा तुझा resume मला पाठव मी बघतो इथ. "पियूष

ओके मी पाठवते"राधा

ओके बाय राधा अँड टेक केअर"पियूष

दोन दिवसांनी राधाचं इंटरव्ह्यू होता .

राधा इंटरव्ह्यूला गेली होती पण पियूषला तिला भेटता आलेच नाही!

संध्याकाळी सुटी झाल्याबरोबर पियूष ने राधाला कॉल केला ..

हॅलो राधा!पियूष

हॅलो पियूष अरे मी आज आले होते इंटरव्ह्यूसाठी पण तुझा फोन लागत नव्हता. " राधा

सॉरी राधा अग मला फोन वापरता येत नाही!पियूष

इट्स ओके! पियूष उद्या मी गावाला परत जाणार आहे !राधा

हे ऐकुन पियूष गप्प च उभा राहिला. कारण एकत्र जॉब करता येईल हे स्वप्न होत त्याच. "राधा

काय झालं राधा इंटरव्ह्यू झाला ना!?पियूष

हो झाला की पण नंतर कळवतो असे सांगितलंय तुला काही सांगितलं तर मला कळव!राधा

हो राधा! बाय अँड टेक केअर! पियूष

टेक केअर पियूष!राधा

असेच दिवस जात होते

हल्ली पियूषला कामातून राधाला मेसेज करायला वेळ भेटत नहवात. तास तर राधाला रात्री. किवा पहाटे मेसेज करून डिस्टर्ब करणे पियूषला आवडत न्हवते.

तिची आठवण आली की फकत तिचा पेन आणि तिच्या सोबत असलेला फोटो बघून पियूष मनाची समज काढत होता

एके दिवशी पियूष ने राधाला मेसेज केला.

हाय कशी आहेस राधा?जॉब च काय झाल?"पियूष

मी मस्त आहे आणि मी 1 सप्टें. बरला जॉईन झालेय

हॉस्पिटल फार्मसी करतेय. "राधा

राधा एट लिस्ट मला सांगायचं तरी होतेस तुला पहिल्या दिवशी बेस्ट लक करायचं होत!पियूष

लिव्ह इट पियूष !राधा

ओके राधा टेक केअर. "पियूष

असेच दिवस जात होते

तो ऑगस्ट चा पहिला रविवार होता.

फ्रेंडशिप डे... त्यादिवशी सुट्टी नहवाती म्हणून पियूषला राधाला विश करता नाही आले.

संध्या काळी पियूष ने उशिरा राधाला मेसेज केला.

हॅप्पी फ्रेंडशिप डे राधा.. "पियूष

पण राधा ने रिप्लाय दिलाच नाही

कदाचित एवढ्या उशिरा राधा जागी नसेल म्हणून त्याने मग आणखी एक मेसेज केला.

गुड नाईट अँड टेक केअर राधा"

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी पर्यंत पियूष ने वाट बघितली पण राधाचं रिप्लाय न्हवता..

म्हणून मग पियूष काळजी करू लागला..

त्या संध्याकाळी राधा चा रिप्लाय आला.

गुड नाईट"

राधा एक फॉर्मिल्टी म्हणून तरी रिप्लाय करायचा होतास ना .. मला तुझी काळजी वाटते म्हणून मी तुला मेसेज करतो,तुझ्याशी बोलतो पण जर तुला खरच माझ्याशी नसेल बोलायचं तर मी नाही बोलणार फकत काळजी घेत जा"पियूष

अरे तसे काही नाही पण मला माझी अशी काळजी केलेली नाही आवडत कोणी!

आणि जर तुलाच बोलायचं नाहीये तर मग मी पण... !राधा

ऐक राधा सॉरी मी नाही तुझी काळजी करणार पण म्हणून मग तू विसरून नाही ना जाणार?पियूष

नाही रे आपल्या क्लासमेट्स ना कोण विसरता का?राधा

राधा क्लासमेट्स की फ्रेंड्स?पियूष

राधा तू हवा तेवढा वेळ घे पण या प्रश्नाचं उत्तर दे!

क्लासमेट्स! राधा

ओके thanks वेळिच माझा गैरसमज दूर केलास..

चला कदाचित मला दुसरी फ्रेंड बघावी लागेल.. "पियूष

मे बी"राधा

ओ मॅडम फ्रेंडशिप म्हणजे काय बाजारातली भाजी आहे का एक आवडली नाही म्हणून दुसरी बघायला.

माझ्यासाठी तूच स्पेशल होतीस आणि इथून पुढे पण तूच असशील"पियूष

अरे माझ्यापेक्षा चांगली मैत्रीण भेटेल तुला"राधा

हो नक्की भेटेल पण ती राधा नसेल ना?राधा मी तुझी काळजी करतो हाच तुझा प्रॉब्लेम आहे ना मग नाही करणार तुझी काळजी .. पण मग तुझ्याशी बोलू शकतो ना?पियूष

हा आता तुला च जर बोलायचे नाही तर मी काय करू!राधा

ओके बर जाता जाता एक बोलू का?पियूष

हा बोल की!राधा

!

!"

!

!टेक केअर राधा,😆"पियूष"

गुड नाईट "राधा

असेच दिवस जात होते.. राधाला हळू हळू विसरायचं प्रयत्न करत होता. पण खर प्रेम होत ना म्हणून मग क्षणा क्षणाला तिची आठवण पियूषला सतावत होती.

असेच दिवस जात होते.. हळू हळू पियूष ने राधाला मेसेज करणे बंद केले पण त्या दिवशी संध्याकाळी बरोबर रात्री बारा वाजता मेसेज केला.

"जीवन गाणे तुझे आनंदाच्या सुरांनी गावे

आयुष्याच्या वेलीवर फक्त सुंदर फुलानीच फुलावे

निरभ्र चांदण्यापरी

आयुष्य तुझे आनंदाने उजळावे.

राधेच्यासोन पावलांनी

हलकेच स्वप्नांनी तुझ्या उमलून

जीवनाच्या वाटेवर तुला पावलोपावली आनंद मिळावा

आयुष्याचा समुद्र तुझा सोनेरी लाटांनी

भरावा

पावलोपावली तुला सुखाची मिळावी

दुःखाची चाहूलही तुला कधी न मिळावी

जीवन तुझे सुखाच्या सप्तरंगात रंगून जावे

असे हे सोनेरी दिवस जात

फिरुनी पुन्हा यावे... "

Wish you happy birthday राधा

ही तीच कविता होती जी पियूष ने कॉलेज मधे लिहली होती.

मज्जा माझा खर birthday नाहीये आज. "राधा

बरं बाबा पण कविता कशी आहे सांग की!"पियूष

मस्त आहे "राधा

हळू हळू पियूष ने पुन्हा राधा सोबत बोलणे सुरू केलं.. पण आता फारच कमी वेळा राधा त्याला रिप्लाय देत होती...

इकडे पियूष मात्र तिच्या आठवणीत आणि काळजीत तीळ तीळ मरत होता.

एके दिवशी संध्याकाळी पियूष ने एक कविता पोस्ट केली..

"हरवली आहेस तू कुठे तरी

उगाचच मला असे वाटते

माहित नाही का तुझीच

आठवण मनी दाटते.

जरी आहेस दूर तरी ही

तुझीच आठवण का असते?

माहित नाही मला

तू हरवली स कुठे असे का वाटते?

बोलताना तुझ्याशी पूर्वी सारखे

आपले पण वाटत नाही

कधी तरी येणारा तुझा रिप्लाय

आता तो सुध्दा येत नाही.

माहित नाही मला

तुझी सतत काळजी का करतो?

भेटशील जशी पूर्वी होतीस तशीच

आता तेवढ्याच आशेवर जगतो..

माहित नाही पुन्हा कधी भेटशील का?

भेटलीस तर मात्र पुन्हा तीच ओळख दाखवशील का?

तुझा प्रत्येक रिप्लाय फक्त फॉर्मलिटी वाटतो...

नकळत का होईना कधी कधी गळा दाटतो.

असं असूनही तुझ्याशी

गोड मैत्रीचं स्वप्न आजही बघतोय.

शेवटी समजेल तुला माझी मैत्री

आता तेवढ्याच आशेवर जगतो य"

राधा ने ती कविता पाहून पियूषला मेसेज केला!

माझ्यासाठी स्टेटस् ठेवलं आहे का?"र

पियूष आपल नात आपल्या ठिकाणी योग्य आहे आपण योग्य वेळी थांबुया,यातून फकत दोघांनाही त्रास च होईल!"राधा

पण पियूष ने काही वाच्ण्याआधी मेसेज ड्डीलीत केला.

त्या रात्री पियूष खूप रडला..

तो आता राधाला विसरायचं प्रयत्न करत होता. पण जेवढा प्रयत्न करत होता तेवढाच तो त्रास करून घेत होता.. फक्त तिच्यासाठी कविता पोस्ट करत होता . एकाध्या जिवंत प्रेता प्रमाणे त्याने त्याची अवस्था करून घेतली होती...

..................................

असेच दिवस जात होते पियूष ना राधाला विसरला होता.. ना त्याने दुसऱ्या कशात स्वतःला गुंतवून घेतले होते..

एक दिवस राधाला पियूष ने कॉल केला आणि Ab+ त्या ग्रुपचे ब्लड भेटेल का विचारले..

सुरुवातीला राधा घाबरली तिने लगेच फोन करून पियूषला काय झालंय विचारले?

अग काही नाही माझ्या ताईची सर्जरी आहे त्यासाठी लागणार आहे..

हो मी बघेन पण आणखी काही लागलं तर सांग ऐवढेच बोलली ती

...................................

जवळ जवळ पाच ते सहा महिने झाले होते राधा नी पियूष दोघे पण एकमेकांशी बोलले न्हवाते. पण इकडे पियूष मात्र नेहमी तिचाच विचार करत होता. कधी अनघा तर कधी प्रेरणा कधी मिरा कोणाला ना कोणाला तरी ती कशी आहे एढच विचारायचा..

त्या दिवशी त्याने त्या कवितेचा स्क्रीन शॉट काढून स्टेटस्ला ठेवला...

तीच कविता जी की त्याने तिच्या वाढदिवसा दिवशी ल्हीहली होती..

आणि ओल्ड मेमरी असे कॅप्शन दिले...

स्टेटस् बघून अदितीने त्याला राधाबद्दल विचारले

पियूष ने तिला सगळ काही सांगितलं

सांगताना पियूष फोन वर रडत होता..

" पीयूष शांत हो .. कधी कधी नेमेक आपल्याला जे हवे ते. भेटत नाही म्हणून असं जगणं थांबवायचं नसत.

पीयूष शांत हो,पियूष ऐकतोय ना?"आदिती

आज तिला विश करू का ?पियूष

अरे कर की ती चांगली मुलगी आहे घेईल समजून .. "आदिती

शेवटी पियूष ने राधाला मेसेज केला.

राधा ने पण त्याला रिप्लाय दिला...

..................................

काही दिवस असेच गेले पियूष ने स्वतःच जगणं हरवून बसला होता..

तिच्यासाठी लिहलेल्या कविता पोस्ट करत करत पियूष स्वतचं स्वतःची समजूत काढत होता. की एक दिवस नक्की तिला प्रेम समजेल..

एके दिवशी राधा ने त्याला फोन केला

पीयूष ने सुरवातीला फोन रिसिव्ह केला नाही

पण मग राधा ने पुन्हा पुन्हा कॉल केले.

"माझी काय चुकी झालीय मला याचा खूप त्रास होतोय राधा"पियूष

पियूष तुझ्या समोर तुझ करिअर आहे नाही त्या गोष्टीत कशाला अडकून पडतोय.. समजतं ना मी काय बोलतेय माझं ऐक माझा विचार करणं सोड! पियूष ऐकतोय स ना?

पियूष रडत रडतच बोलत होता

राधा मला त्रास होतोय या सगळ्याचा"पियूष

पियूष मला समजतंय या सगळ्याचा तुला त्रास होतोय .,पण ?"राधा

पण काय राधा"?पियूष

राधा ने कॉल कट केला...

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी पियूष ने तिला मेसेज केला

" राधा मी मेसेज करतोय त्याबद्दल सॉरी आपल बोलण अर्धवट राहील म्हणून हा मेसेज करतोय

राधा माझ्याशी बोलायचं न्हवत तर मला सांगायचं तू

मी ऐकलं असत तुझ.. पण तू असं सगळं बोलण थांबवलं म्हणून मग मी असा त्रास करून घेतला...

मला माहित नाही मी तुझी काळजी करायचो कधी थांबेल!

पण माझ्यासाठी तू नेहमीच स्पेशल होतीस आणि स्पेशल राहशील...

ऐक ना मला तू ब्लॉक कर नाही तर मी वेड्या सारखी काळजी करत बसेन"मनावर दगड ठेवून पियूष ने राधाला ब्लॉक करायला सांगितले...

राधा ने पण त्याला ब्लॉक केले...

..........................,...... असेच दिवस जात. होते पण पियूष काहीं केल्या राधाला विसरला नाही..

कारण दोघेपण एकाच शहरात होते.. शेवटी पियूष ने एक दिवस राधाला मेसेज केला..

राधा मी सगळ काही विसरून गेलोय ...

पूर्वी सारखे एक चांगले फ्रेंड्स बनून राहू या...

पण राधा ने पुन्हा रिप्लाय देणं टाळले...

पुन्हा काही दिवस गेल्या नंतर पियूष ने पुन्हा मेसेज केला

" राधा मी सगळ विसरून गेलोय आपण बो लु या का?

शेवटी राधा ने रिप्लाय दिला..

" मला नाहीये तुझ्याशी बोलायचं"

राधा एकदा बोलूया फकत एकदा" पियूष

मला नाहीये बोलायचं"

ओके राधा तुला नाहीये ना बोलायचं तू नको बोलू

पण माझ्या एका प्रश्नाचं उत्तर दे

त्या नंतर तुला परत माझ्या कडून कसलाच त्रास होणार नाही

त्या नंतर तुझे रस्ता वेगळा आणि माझा रस्ता वेगळा..

त्या नंतर मी विसरून जाईल की कधी तरी कोणती तरी राधा माझ्या आयुष्यात आली,आणि कधी तरी मी तिला भेटलो. फक्त त्या एका प्रश्नाचं उत्तर दे

राधा तुला माझ्याशी का बोलायचं नाही?

हे बघ पियूष मी जो काही निर्णय घेतला त्यात च आपल भल आहे .. काही गोष्टी आहेत अशा आपण वेळीच नाही थांबलो तर त्यातून फक्त दोघांना त्रासच होईल. "राधा

ओके राधा thanks माझ्याशी बोललीस त्यासाठी आज पासून तुझा रस्ता वेगळा आणि माझा रस्ता वेगळा. " पियूष

हा मेसेज टाईप करताना पियूष चाअक्षरशः रडून चेहरा ओला चिंब झाला होता

त्याला तीच आठवत होती...तीच बोलण,तीच हसणं,त्याच्याशी बोलताना होणारी तिची ती बावरी नजर...

असेच दिवसामागून दिवस जात होते...एका दिवशी पियूष ने एक कविता पोस्ट केली

तु सोबत नसताना

तु सोबत नसताना
सोबतीला तुझी आठवण असते.
मन चिंब करणाऱ्या
तुझ्या आठवणीची
आता मात्र डोळ्यात साठवन असते...

तु सोबत नसताना
माझा श्वास तुझा भास
माझा एकच ध्यास तुझी
लागलेली आस

तु सोबत नसताना
तुझ्याशी बोलताना राहिलेल्यालल
शब्दांचा अर्थ आता शोधत असतो.
न सुटलेल्या प्रश्नांना

आता उत्तर शोधत असतो...

तु सोबत नसताना

त्याच वाटेवर चालतांना आता

पाऊले पण अडखळतात

आता सोबतीला कोणी नाही

याची जाणीव करून देतात...

तु सोबत नसताना

आता जगण्याचा अर्थ शोधतोय

जन्मभरासाठी स्वप्न पाहिलेल्या नात्याला

आता विसरायचं प्रयत्न करतोय...

तु सोबत नसताना

चालतांना प्रत्येक पावलाला

आता तुझीच आठवण असते

एकटेपणात आलेली तुझी आठवण

मला त्याच वाटेवर बोलवत असते...

ती पोस्ट पाहून आदिती ने मेसेज केला.

"हाय पियूष कसा आहेस!"आदिती

"मी ठीक आहे . आणि तू?"पियूष

मस्त. राधा कशी आहे?" आदिती

असेल ती ठीक" पियूष

पियूष सगळ ठीक आहे ना राधाशी बोलतोस ना?"आदिती

नाही. म्हणजे मीच तिच्या पासून लांब गेलोय. "पियूष

काय झालं?"आदिती

अरे असं नात काय कामाचा जे की तिला नको असलेले ओझ वाटतयं. म्हणून मग मीच तिच्या पासून लांब गेलो कायमचा.. "पियूष

पियूष तू चुकतोय स असं कोणाला च कोणतंच नात ओझ नसत..

ती काही बोलली का?म्हणजे तस्स तिने स्पष्ट पणे सांगितलं का?"आदिती

नाही ग आदिती तिनं काहीच सांगितले नाही ती बोलत नाहीये याचाच तर प्रॉब्लेम आहे"पियूष

मग बघ तूच जरा विचार कर तिचा काही तरी असेल ना प्रॉब्लेम?"आदिती

अग आदिती मला याचीच तर भीती वाटते ना की ती कुठल्या प्रॉब्लेम मध्ये नसावी म्हणून च तर मी तिझी काळजी करत बसतो.. " पियूष

वेडा कुठला आधी सॉरी बोलं तीला.. "आदिती

Thanks आदू मुळात तू मला चुकीचं कधीं वागू देत नाहीस”पियूष

बरं बरं जाऊ दे ते आधी आणि तुझ्या राधाला कॉल कर बघ ती रिसिव्ह करेल”आदिती

त्याच रात्री पियूष राधाला कॉल करतो पण राधा कॉल रिसिव्ह करत नाही.

अदु राधा कॉल घेत नाहीये. ”पियूष

अरे पियूष रात्रीचे अकरा वाजलेत आता. जरा तिचा पण विचार कर एवढ्या रात्री ती कसा कॉल रीसिव करेल,उद्या ट्राय कर बघ नक्की रिसिव्ह करेल ती. ”आदिती

गुड नाईट आदी टेक केअर”पियूष

गुड नाईट पियूष आणि आता उगाच त्या गुलाम अलीच्या गझल ऐकत बसू नकोस टेक केअर पियूष”आदिती

उद्या कॉल केला तर राधा रिसिव्ह करेल का?आणि केला तर तिच्याशी काय बोलायचं याचा विचार करत करत पियूषला झोप कधी लागली ते समजल नाही. ”

सकाळी सकाळी पियूष ने राधाला मेसेज केला.

गुड मोर्निंग राधा हाय कशी आहेस तू,ऐक ना जे काही झालंय ते विसरून जा पुन्हा एकदा आपण पहिल्यासारखं बोलू शकतो ना,ऐक ना राधा तुला माहित आहे की माझ्या आयुष्यात तू किती महत्वाची आहेस ते.. प्लीज एकदा बोल मी तुझ्या उत्तराची वाट बघतोय…”पियूष

त्या दिवशी दिवस भर पियूष च लक्ष कशात च न्हवत . वेळ मिळेल तसे तो इनबॉक्स बघत होता. राधा चा रिप्लाय आलंय का ते बघत होता. पण राधा ने नाही रिप्लाय दिला.

पीयूष ने पुन्हा एकदा मेसेज केला…

“राधा माझ्यामुळे तुझी लाईफ डिस्टर्ब होतेय ते समजतंय मला.. पण एकदा बोल ना प्लीज. प्लीज एकदा बोल.. राधा प्लीज...”पियूष

मला नाहीये तुझ्याशी बोलायचं”राधा

ओह thanks रिप्लाय दिला त्याबद्दल. तुझी लाईफ तुझ्या समोर आहे.. आणि माझी माझ्या समोर.. ”पियूष

ती तर सगळ्या समोर असते”

विश यू हॅपी लाईफ जर्नी राधा...टेक केअर”पियूष मेसेज टाईप करताना डोळ्यातील पाणी नकळत कधी ओघळाले पियूषला समजल नाही. तसेच डोळे पुसून पियूष राधा चा मेसेज वाचत होता.

विश यू हॅपी लाईफ जर्नी टेक केअर”राधा

“जाता जाता एक एक बोलू का?”पियूष

हा बोल!”राधा

टेक केअर राधा. ऐक ना तसं पण आता आपले रस्ते वेगळे आहेत. एक गोड आठवण म्हणून मला तुझ्याशी बोलायचं आहे. एकदा बोलू या का?प्लीज,उरलेले आयुष्य मला तुझ्याशी न बोलता रहायचय प्लीज एकदा बोल. राधा मी तुझ्या कॉल ची वाट बघतोय”पियूष

“मी नाहीये बोलणार तू दरवेळेस अश्या टोकाच्या गोष्टी करतोस. पियूष तुला भ्रमात ठेवायचं नाहीये मला म्हणून तर मी तुझ्या पासून लांब गेले.. तु एक चांगला मुलगा आहेस माझ्या हीपेक्षा चांगली मुलगी येईल तुझ्या आयुष्यात.. ”राधा

हो येईल ना पण ती येणारी मुलगी,राधा तर नसेल ना?”पियूष

राधा एकदा बोल ना प्लीज एकदा बोल मी तुझी वाट बघतोय..

त्या दिवशी राधा ने कॉल केलाच नाही मग शेवटी पियूष नेच तिला एक मेसेज केला

.......................................................................................

" राधा मला असं अस सारख सारख तुझ्याशी बोलण नाही आवडत पण दर वेळेस आपलं बोलण अर्धवट राहिले म्हणून आज तुझ्याशी बोलतोय कदचित हे आपल शेवटचं बोलण असेल

का य बोलू मी... बघ ना ... बोलायचं. पण आहे आणि काय बोलू. ते पण समजेना... ऐक ना मला माफ कर... माझ्याशी.. नाहीये. ना बोलायचं... मग नको.. बोलू... खरच. नको. बोलू.. पण मला मात्र बोलू दे... एकदा मला ऐकून तर घे... प्लीज...

माझ्यासाठी तू खरच स्पेशल होतीस.. मी कधीच एक टाइम पास म्हणून. कधी या सगळ्या गोष्टींकडे बघितलं न्हवत... पण.. कधी. तुला.. समजलच. नाही.. तुला आठवत नसेल.. पण आजच्या. च दिवशी.. ते biopharmचे प्रॅक्टिकल. केलं. होत.. आपण.. आणि. मला वाटल. की जिला. मी शोधत. होतो. ती कदाचित. भेटली. मला. नात्याला. काय नाव. असावं. यापेक्षा. एक. नात असावं. याचाच. मी विचार करत आलो.. नेहमी मला ऐवढच वाटायचं की कॉलेज संपलं तरी.. एक रीलेशन टिकाव.. मनमोकळे पणे. तुझ्याशी बोलावं. सगळ शेअर करावं.. म्हणून तर माझ्या ताईच्या ऑपरेशन वेळी. खूप डिप्रेशन मध्ये असताना.. तूझ्याशी शेयर करायचो.. पण गंमत अशी की. माज मलाच समजत न्हवत की. एक सोबतीला प्रवासी भेटला. म्हणून त्याच्या सोबतीची. आयुषभरासाठी अपेक्षा ठेवायची नसते,!बरोबर ना?

पण काही सोबतीचे प्रवासी असतातच असे.. अलगद एक वेगळंच नात. तयार करून जातात.. अगदी तसंच काहीस झालं... हो झाली माझी चुकी.. पण कुठ तरी तू मला माझी चुकी

दाखवायला. हवी होतीस.. ऐक ल असत मी तुझ.. पण तू अचानक सगळाच कॉन्टॅक्ट तोडलास.. तुला आठवतंय का आपल्या कॉलेज्च्या

लास्ट डेला मी एक प्रॉमिस मागितलं. होत.. की कधी विसरणार नाहीस ना? पण तेव्हा पण तुला समजल नाही होय... खरच. तू माझ्यासाठी खूप महत्वाची होतीस.. becouse you change my life by giving me some new hopes.. तुला हे सगळे. फिल्मी वाटत असेल ना पण नाही खरच तू माझी लाईफ chsng केली होतीस.. जस्ट फकत एकदा मला समजवायचा होतेस.. माझ्या लाईफ मधला.. सगव्ळ्यात आनंदाचा.. आणि कधी विसरू शकणार नाही असा दिवस होता तो.. प्रोजेक्ट चा...

शेवटी. प्रेम वैगेरे काय असते... अर्थ नाही समजून घेतला तर फक त एक जोड शब्द आणि असं पण प्रेम, नात म्हणजे तरी काय एकमेकाच्या. भावनांचा आदर. म्हणजे च तर खर नात... तुला हेच पाहिजे ना की मी तुझ्या लाईफ मधे डिस्टर्ब करू नये. माझे प्रॉमिस आहे नाही करणार तुला डिस्टर्ब.. पण फक्त.. जे काही गैरसमज झालेत ते दूर कर..

तुला माझ्याशी बोल असं मी फोर्स कधीच नाही करणार.. नाही.. कारण तुला शिंक जरी लागली तरी काळजी करणार मी तुला एखद्या गोष्टीचा त्रास कसा होऊ देईन आणि ते पण माझ्यामुळे... ऐक की झालं गेलं सगळ विसरून जा.. आणि हो. मी तुझ्याशी न बोलण्या न हॅपी राहणार असशील. ना तर मी आनंदांन तुझ्या लाईफ मधून निघून जाईन.. कायमचा.. फक्त. मनात. कासला राग, तिरस्कार. ठेवू नको.. अाे मॅडम तुम्हाला त्रास देऊन मी हॅपी राहीन का? सो आता माझा रस्ता खरच वेगळा असेल.. आणि तुझी परवानगी असले तर फकत तुझ्या वाढदिवसासाठी फक्त वर्षातून एकदा तुझ्याशी बोलेल.. काळजी घे.. काळजी. घे असं म्हणलेले तुला आवडत नाही ना .. डोन्ट वरी. पुन्हा.. हे शब्द नाहीत तुला त्रास देणार... आणि अशीच आयुष्यभर आनंदी रहा.. आणि ती चेहऱ्यावर असणारी स्माई ल कधी हरवून देवू

नको... आणि मला माफ कर.. कळत नळतपणे काही चुका झाल्या त्या माफ कर.. आणि हो.. हॅपी रहा...

I hope .... खूप काही बोलायच होत. पण आता थांबतो becouse I am crying yar.. inside the hert... पन मला माफ करा मला तुला त्रास न्हवता द्यायचा... take care..... आणि एक गाणेmail करतोय प्लीज ते ऐक.. प्लीज.. आणि wish you happy life journy... 😊

ऐक की राधा आपण पहिल्यासारखं कधीच बोलू नाही शकत का?

जाऊ दे तुला जर माझ्याशी बोलायचं नसेल तर नको बोलू.. पण राधा मला खरच माफ कर..

कदाचित मीच चुकलो मीच तुझा विश्वास गमावून बसलो.. जरी आपण बोलणार नसलो तरी आठवणीत राधा तूच कायम असशील?

तुला नाही ना बोललेले आवडत मग नाही बोलणार तुझ्याशी !

फकत कायम हॅपी रहा आणि काळजी घे...

आणि हो तुझ्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य कधी हरवू देऊ नको.. टेक केअर....

जर तुला आवडणार असेल तर फकत एकदा तुझ्याशी बोलेन तुझ्या वाढदिवसा दिवशी...

ऐक ना राधा जवळ जवळ दोन वर्ष झाली आपण बोललो नाही मला फकत एकदा तुझ्याशी बोलायचय फकत एकदा... आता उरलेले आयुष्य तुझ्या आठवणीत जगायचय एकदा बोल ना राधा माझ्याशी.....

हा मेसेज केल्या नंतर पियूष ने आदितीला कॉल केला....

“हॅलो अदू शेवटी हॅपी एनडीग झाला बघ “पियूष

हॅलो पियूष ऐकतोय स ना आधी शांत हो, आधी मला सांग काय झालाय,

राधाशी बोललास का? काय म्हणाली ती!"पियूष अरे बोल ना काही तरी"आदिती..

आ दु माझी राधा माझं एक सप्न होत आणि कदचित स्वप्न च राहील...

मला नव्याने जगायला शिकवलं होत.. माझी लाईफ चेंज केली होती तीन..

पण आता कदचित राधा नाही येणार माझ्या आयुष्यात पुन्हा कधी.....

कदचित मी तिझ्या आयुष्यात नकोय तिला...माझ्यामुळे ती डिस्टर्ब होतेय..

मग ते मला कसं आवडेल...म्हणून मग मी स्वतःच लांब जातोय तिच्या पासून..... "पियूष

अरे वेड्या तू तिला प्रपोज केलास का!?"आदिती

नाही आदी मी प्रपोज नाही केला...पण मी लाईक करतो हे तिला माहीत आहे....

आणि माझा मला उत्तर भेतलंय,.. बघ ना मी सांगायचं आधीच मी तिला लाईक करतो हे समजले,...... कदाचित हाच असेल माझ्या लव्ह स्टोरी चा हॅपी एंड"पियूष

वेडा कुठला असं नाराज नाही व्हायचं खर प्रेम केलय ना तू मग असं नाराज नाही व्हायचं अरे उलट जे तिला हवंय ते तू देतोय तिला..... पियूष काहीं माणसे खरच असतात अशी त्यांना आपण काय गमावले आहे खरच समजतं नाही. "आदिती

आदू thanks मला माझ्या आयुष्यात एका छान वाटाड्या सारखी नेहमी वाट दाखवली ...राधा मला भेटली नाही याचं खरच दुखः नाहीये...पण लास्ट मोमेंटला मला तिच्याशी बोलायचे होत...तिचा आवाज एकदा ऐकायचा होता...पण नाही बोलू शकलो....... "पियूष

पियूष जर तुझ प्रेम खर होत ना ती नक्की एक दिवस कॉल करेल बघ.. "आदिती

त्या संध्याकाळी पियूष ने एक शेवटची कविता लीहली आणि पोस्ट केली

, नात नसल म्हणून काय झालं

कधी तरी बोलत जा,

नसतात तुझ्याशी गप्पा मारायच्या

फक्त तू कशी आहेस एवढंच सांगत जा

नात नसल म्हणून काय झालं

कधी तरी बोलत जा!

कदाचित आठवत नसेल तुला

तुझ प्रॉमिस तेव्हा बोलली होतीस तू

विसरणार नाही कधी

त्या प्रॉमिससाठी तरी बोलत जा

नात नसल म्हणून काय झालं

कधी तरी बोलत जा!

कधी कधी मनाला उगाच वाटत

बदलनाऱ्या वेळे सोबत

बदलूनही गेली असशील तू

पण, म्हणून काय झालं

कधी तरी बोलत जा

फक्त कशी आहेस एवढं तरी सांगत जा

नात नसल म्हणून काय झालं

कधी तरी बोलत जा!

माझं वेढच मन ते

उगाच तुझी काळजी करत बसत

कशी असशील तू याच विचारत झुरत बसत

कधी तरी माझी काळजी समजून घेत जा

नात नसल म्हणून काय झालं

कधी तरी बोलत जा?

तुला माहित आहे का पूर्वीच्या

चॅटचे स्क्रीनशॉट अजून जपून ठेवलेत मी

माझ्या एकटे पणातले सोबती माझे

ते बघताना कधी कधी रडाव वाटत

म्हणून कधी तरी माझ्याशी बोलत जा

फक्त कशी आहेस एवढं तरी सांगत जा

नात नसल म्हणून काय झालं

कधी तरी बोलत जा!

तुझ्या येण्याच्या वाटे कडे बघून

आता डोळे पण क्षीण झालेत

माहित आहे तू पुन्हा येणार नाहीस

पण कान मात्र तुझ्या

एका call ची वाट बघतायत

प्लीज एकदा बोलून बघ

आता एवढंच सांगायचंय तुला

फक्त कशी आहेस एवढं तरी सांगत जा

नात नसल म्हणून काय झालं

कधी तरी बोलत जा!

आदिती ने ती कविता पाहून मेसेज केला

पियूष बदलायच ठरवलय ना तू.... नको अडकून राहू..."आदिती

हो र बाबा पण वाटली एक शेवटची कविता लिहावी म्हणून लिहिलं.....

माझी शेवटची कविता......त्या कवितांची सोबत असते मला माझ्या एकटेपणात ...

ओ य पागल तू एकटा नाहीस मी आहे की हक्कची मैत्रीण..."आदिती

हो र बाबा तू आहेस की........ पियूष

..............................................

दुसऱ्या दिवशी सकाळी पियूष ने आदितीला कॉल केला.

हॅलो आदु मी स्टोरी लिहून तुला मेल केलीय बघ"पियूष

काय ?स्टोरी लिहून पण झाली!"काहीशी आश्चर्याने च अदितीने विचारल

हो झाली पण आता ती डायरी घेऊन ये"पियूष

म्हणजे तू रात्र भर झोपला नाहीस फकत्त स्टोरी लिहीत बसलास अरे पियूष आता तरी असा वेडेपणा सोडून दे. आता तरी स्वतःसाठी जगायला शिक. "आदिती

हो ग आदिती "पियूष

बरं मी संध्याकाळी भेटते तुला. "आदिती

आता पियूष आदिती ची वाट बघत होता.. पूर्ण दिवस तिचीच वाट बघत होता..

शेवटी एकदाचे सहा वाजले आणि थोड्याच वेळात आदिती ने कॉल केला

हॅलो पियूष मला कुठे भेटशील ?आदिती

अरे कुठे म्हणजे तू घरी येतेस ना?पियूष

अरे घरीच येणार होते पण मला थोड बाहेर जावं लागणार आहे.. "आदिती

ओके मग तुला सोयीस्कर ठरेल अश्या ठिकाणी भेटूया. "पियूष

ओके मग संध्याकाळी मला फ्रेंड्स कट्टा मध्ये भेट.. "आदिती

ओके बाय"

संध्याकाळी पियूष ठरल्या प्रमाणे तिथे गेला...

अजुन पण आदिती आली नाही हे बघून पियूष ने तिला कॉल केला

हॅलो आदिती कुठे आहेस तू"पियूष

अरे सॉरी पियूष मी तुला सांगायचं विसरले.... माझं कॉलेज सुरू होतेय उद्या पासून आणि उद्याच प्रोजेक्ट च प्रेझेंटेशन आहे आणि एक्सांम पण सुरू होतेय लगेच सो आता किमान महिना भर तरी मी घरी येणारा नाहीये"आदिती

बरं मग डायरी कधी देशील !?पियूष

अरे बाबा मी घरी येईल तेव्हाच तर तुला तुझी डायरी मिळेल..."आदिती

बरं ते जाऊ दे ती स्टोरी घेऊन तू नक्की काय करणार आहेस?पियूष

अरे हो तुला स्टोरीबद्दल सांगायचं विसरले अरे पियूष मी त्या स्टोरी च बुक बनवतेय एका पब्लिकेशन हाऊसला मी स्टोरी पण पाठवली आहे.. छान लिहिलय तू अगदी हर्ट टचींग लिहली आहेस.... पण रियल लाईफसारखं एंड मात्र अर्धवट ठेवलाय"?पियूष बरोबर ना?आदिती

हो ग आदू शेवट अर्धवट राहिलाय त्याचा...पण मुळात मी जे काही घडलं तेच लिहलय"पण तू हे पुस्तक वैगेरे काय चालवले आहे?पियूष

वेडा कुठला अरे हे सगळ मी त्या आकडू राधासाठी करतेय...कारण पुस्तक वाचून ती नक्की कॉल करेल बघ तुला..."आदिती

काय ग आदू असं अकडू नको म्हणू तिला"पियूष

अय्यो राग आला होय..."आदिती

नाही ग पण तू लवकर ये मी वाट बघतोय तुझी"पियूष

अरे पियूष ऐक की त्या आकडु राधासाठी काही तरी मेसेज लिही की पुस्तकाचे शेवटी ते वाचून बघ ती नक्की कॉल करेल.. "

ओके मी लास्ट मेसेज पाठवतो तुला.. "पियूष

दोन शब्द राधासाठी

..................................

राधा तू जिथे कुठे असशील तिथं हॅपी रहा आणि काळजी घे... तुझ माझ्या आयुष्यात येणं जरी एका गोड स्वप्नासारखं होत...पण तुझ नसन तितकंच जळजळीत वास्तव...

प्रेमात जिंकण कीव हरण असं काही नसत...मी जिला शोधत होतो टी मला भेटली यातच मी जिंकलो......तूच एक वाऱ्याची झुळूक होतीस.... वाऱ्याची झुळूक जीचा सहवास एका क्षणाचा असतो.... पण मनातील आठवणीच दरवळ जन्मोजन्मी असतो. तशीच तुझी प्रत्येक आठवण माझ्या सोबत असेल...माझ्या सावली सारखी

राधा मी आपली गोष्ट लिहिली आहे खरी पण कायमच ती अपूर्ण राहील या गोष्टीचा

शेवट तुला लिहायचं आहे.. जरी मी सुरुवात केली असली तरी शेवट मात्र तू लिही... मी तुझी वाट बघतोय.....

........................ पियूष"

दुसऱ्या दिवशी आदिती ने कॉल केला

हेलो पियुष काय मस्त लिहिलय रे तू हा लास्ट मसेज वाचून ती आकडू राधा कॉल करेल बघ नक्की करेल..."आदिती

अरे आदी तिला नको असं बोलत जाऊ आकडू वैगेरे.. "पियूष

सॉरी बाबा मी विसरले इथ देवदास टाईप माणसे तिची काळजी करतात आणि त्यांना राग पण येतो.. "आदिती

सॉरी बाबा पण तू लवकर ये...

हो रे पियूष "

असेच दिवस जात होते दिवसा मागून दिवस जात होते . आता पियूषचे पुस्तक पण प्रकाशित झाले होते.. पियूष फक्त आता फोन ची वाट बघत होता.. तसे त्याला आधी पण बरेच कॉल आले होते राधा म्हणून पण सगळे फेक कॉल होते...

त्या दिवशी पण असच फोन वाजत होता.. एवढ्या रात्री कोण कॉल करेल याचा तो विचार करत होता कदाचित राधा असेल पण अशीच कोणी तरी बनावट राधा असे समजून पियूष ने कॉल उचलला ....

हॅलो हॅलो...समोरून काहीच आवाज येत नव्हता...

पियूष काय समजायचे ते समजून गेला..

हॅलो राधा . हॅलो राधा मला माहित आहे तूच आहेस!तूच ना!हॅलो माझ्याशी एकदा बोल प्लीज एकदा बोल.... "पियूष

पण काही समजायच्या आतच राधा ने कॉल ठेवला..

पियूष ने तसंच आदितीला कॉल केला.

हॅलो आदी आज राधाचं कॉल आला होता.. "पियूष

अरे मग छान की मग काय बोलली ती ?आदिती

काही नाही तिनं काही बोलायच्या आतच कॉल कट केला.. "पियूष

अरे मग ती दुसरी कोणी तरी असेल उगाच तुझी गंमत करायची म्हणून कॉल केला असेल"आदिती

नाही आदी ती राधाचं होती..,"पियूष

बरं तू शांत हो. आधी"आदिती

आदू तू कधी येणार आहेस परत.. "पियूष

अरे मी येतेय लवकरच"आदिती

काही दिवसांपूर्वी खरंतर आदिती कॉलेजला वैगेरे गेली च न्हवती..

तिच्या कडे पियूष ची डायरी होती. त्या डायरीच्या आधारे आदिती ने राधाशी contact करायचा प्रयत्न केला.. पण कुठेच तिला काही सापडत न्हवत..

शेवटी तिला आठवलं की राधा कोणत्या तरी मेडिकल कोडिंगच्या कंपनीत काम करते. आणि आदितीला दीप्ती चीआठवण झाली.

दीप्ती अदितीची बारावीतील क्लासमेट होती पुढे दीप्ती ने फार्मसीला एडमिशन घेतले ते पण पियूषच्याच कॉलेज ला

शेवटी आदिती ने दीप्तीला कॉलं केला.

हाय दीप्ती कशी आहेस तू?आदिती

मस्त आहे मी आणि तू ?मी पण मस्त!

बाकी जॉब वैगेरे ?दीप्ती "

नाही ग माझं मास्टर्स चालू आहे लास्ट इयर.. "!बाकी तुझा जॉब वैगेरे ?

"आदिती

हा माझा जॉब सुरू आहे एका मेडिकल कोडिंग कंपनीत आहे मी. असोसिएट म्हणून.

मेडिकल कोडिंग म्हणताच आदितीला आठवलं की पियूष ने तिला सांगितलं होत की राधा सुधा मेडिकल कोडिंग चाच जॉब करते.

ऐक की मला जरा तुझी मदत हवी आहे करशील का. "आदिती

हो नक्की म्हणजे काय प्रॉब्लेम झालंय का ग"दीप्ती

तसं प्रॉब्लेम वैगेरे नाही. काय तूला सुट्टी कधी असते. "आदिती

सुट्टी तर आजच आहे मला. "दीप्ती

ओके तर मग मला कुठे भेटशील मी तुला भेटून च सविस्तर सांगेन.. "आदिती

ओके मी तुला माझा पत्ता पाठवते तिथच भेट. "दीप्ती

दीप्ती ने तिला तिच्या फ्लॅटचा पत्ता पाठवलं"

अग दीप्ती जरा तुझ्याशी महत्त्वाचं बोलायचं होत म्हणून मग तुला म्हणल बाहेर भेटू कुठे तरी"आदिती

अग मी एकटीच असते "दीप्ती

एकटीच असतेस तू"आदिती

एकटी म्हणजे तश्या आम्ही दोघी राहतो पण आमचा फ्लॅट 2BHk आहे.

माझी एक क्लासमेट आहे ती आणि मी राहते.

बर मग भेटूया संध्यकाळी"आदिती

आदिती ठरल्याप्रमाणे दीप्तीला भेटायला गेली.

अदितीने दोन वेळा बेल रिंग केली.. थोड्या वेळाने दरवाजा उघडला गेला.

पण दरवाज्यात दुसरीच कोणी तरी मुलगी पाहून आदिती थोडीशी गोंधळून गेली

दीप्ती आहे का?"आदिती

हो आहे ना तुम्ही बसा आत मध्ये ती येईल च एवढ्यात..

"चहा की कॉफी?" नो thanks खरेच नको काही. "आदिती

पण दिप्तीं कुठे आहे?आदिती

दीप्ती होय येईल एवढ्यात बाय द वें मी स्पृहा"त्या मुलीचे बोलण ऐकुन आदिती थोडी दचकली

स्पृहा!दीप्ती ची क्लासमेट का ?

हो पण तुला कसं माहित?स्पृहा

पण त्या प्रश्नाचं उत्तर देण्याचं भान आदितीला न्हवत

ती फकत स्पृहाकडेच पाहत होती

स्पृहा अगदी तशीच होती,साधी सरळ आणि सोज्वळ सौंदर्य..

अगदी तशीच होती ती किंबहुना त्याहीपेक्षा सुंदर होती.. जशी की पियूष ने राधाचे वर्णन केलं होत. अगदी तशीच होती ती.. काहीशी बावरी नजर,बोलके डोळे,आणि चेहऱ्यावरचे तेच लाघवी हास्य.. का ते माहीत नाही पण स्पृहाला पाहून आदितीला राधाचं आठवत होती.....

अग दीप्ती बोलली होती की एका क्लासमेट सोबत राहते म्हणून मी अंदाज बांधला.

मी आदिती दीप्ती ची क्लासमेट ज्युनिअर कॉलेज ची"आदिती बोलली.

तेवढयात दीप्ती आली

हाय आदी कशी आहेस"या आवाजाने आदिती भानावर आली.

स्पृहा ही आदिती आणि आदिती ही स्पृहा

हो ओळखतो आम्ही नाही म्हणजे आताच ओळख झाली.. "स्पृहा

बरं बसा तुम्ही मला जरा लायब्ररीत जायचंय मी निघते.. असे बोलून स्पृहा निघून गेली.

जरी स्पृहा गेलीं होती तरी मात्र आदिती च लक्ष मात्र अपृहाकडेच पाहत होती.

नकळत तिला पियूष आठवला.. किती लकी आहे हा पियूष ही राधा त्याच्या आयुष्यात आली...

जरा वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्या. नंत र दीप्ती ने विचारल

अदिती काही प्रोब्लेम वैगेरे आहे का?दीप्ती

नाही ग त स काही नाही "आदिती

मग अचानक हे मदत वैगेरे"दीप्ती

हो सांगते पण ऐक की मी तुला सांगतेय ते दुसऱ्या कोणाला ही सांगू नकोस अगदी राधाला सुद्धा. "आदिती

एवढं काय सिक्रे ट आहे पण बाबा नाही सांगत कोणाला"दीप्ती

दीप्ती पियूषला ओळखते ना तू ? तिच्या फोन मधला फोटों दाखवून आदिती ने विचारल.

पीयूष होय. !अग पियूष आणि मी क्लासमेट आहोत. "दीप्ती

पण तू कशी ओळखते या पियूष ला.. ”दीप्ती ने अदितीच्या प्रश्नाचे उत्तर देतानाच प्रती प्रश्न केला.

अग मी आणि पियूष अगदी बालपनीचे मित्र आहोत.. एकदम बेस्ट फ्रेंड त्याच्या संबधीत तुला काही सांगायचं होत..

का ग काय झालं पियूष तर ठीक आहे ना!

अग ठीक आहे पण अगदी देवदास झालंय एका मुलीसाठी .. ”आदिती

म्हणजे?”दीप्ती

आदिती ने दीप्तीला सगळ काही सांगितलं..

ओह तर मामला असा आहे तर.. पण मग मी काय मदत करू शकते यात तुमची. ”दीप्ती

दीप्ती हे पुस्तक वाच तुला समजून जाईल सगळ काही...”एवढं बोलून आदिती ने तिला ते पुस्तक दिले...

एक ती.. छान दिसतय पुस्तक पण याचा पियूषशी काय संबंध”दीप्ती

अग दीप्ती ते पुस्तक वाच तरी खर म्हणजे समजून जाशील तू.. ”आदिती

पण अग आदिती या पुस्तकाच्या लेखकांचं नाव कसं नाही या पुस्तकात.. ”दीप्ती

तीच तर खरी गंमत आहे वाच तू हळू हळु येईल तुझ्या लक्षात.. ”आदिती

असं असेल तर मग नक्कीच वाचलं पाहिजे.. ”दीप्ती

बरं मग चल मी येते ”आदिती

अग जाशील की आता कुठे आलीसआणि लगेच जातेस होय.. ”दीप्ती

हो ग हॉस्टेल लाईफ म्हटलं की असेच असते. सातच्या आत घरात”आदिती

आणि दोघीही हसू लागल्या..

चल बाय येते मी पण ते पुस्तक आठवणीने वाच..."

हो ग आदिती वाचते मी ते पुस्तक"

दोन दिवस असेच गेले एके दिवशी दीप्ती ने आदितीला कॉल केला..

हॅलो आदिती मी वाचलं ते पुस्तक "दीप्ती

आदिती पियूष ने लिहलय का ते ?"दीप्ती

त्याची च आहे ना ही स्टोरी.. " पण मग ही राधा कोण?"

म्हणजे ?आदिती ने जरा आश्चर्याने विचारले

अग ज्या प्रमाणे पियूष ने स्टोरी लिहिली तशी राधा नावाची कोणतीच मुलगी नाहीये आमच्या क्लासमध्ये!"दीप्ती

काय?अदितीने थोड गोंधळून विचारले !

अग कसं शक्य आहे अगदी देवदास झालंय तो तिच्यासाठी.. "आदिती

पण अग खरच राधा नावाची कोणच मुलगी नाहीये आमच्या क्लासमध्ये एवढेच काय तर आमच्या बॅच मध्ये पण नाहीये कोण !पियूष आणि मी एकाच बॅच मध्ये होतो. "दीप्ती

अग असं पण असेल ना पियूष ने मुद्दाम नाव बदलून लिहल असेल.. "आदिती

कदाचित.... पण आता त्या पुस्तकाचा काय संबंध आहे.. "दीप्ती

तू शेवटचा मेसेज वाचलास ना?अजुन पण पियूष वाट बघतोय तिची".. आदिती

अरे पण हे पुस्तक लिहून काय फायदा.. ते पुस्तक त्या राधा ने वाचलं पाहिजे ना!दीप्ती

हो ना!आदिती

दीप्ती मला वाटल की मी तुला हे पुस्तक दिलं तर तू ते पुस्तक कसं ही त्या राधा पर्यंत पोहचवशिल पण आता तर ही राधा कोण ते देखील माहित नाहीये...पियूष ची अवस्था बघवत नाहीये ग आता. तो वेडा फक्त एका आशेवर जगतोय की ती राधा एकदा कॉल करेल म्हणून.. "आदिती

आदिती त्याच जर एवढंच प्रेम असेल ना तिच्यावर तर बघ एक दिवस नक्की भेटेल ती राधा..

"बरं चल आता मी आजच गावाला जातेय"आदीती

इकडे दिवस असेच जात होते पियूष फकत फोन ची वाट बघत होता..

एक दिवस असेच सुट्टीच्या दिवशी दीप्ती आणि स्पृहा दोघी पण घरी होत्या..

दीप्ती तेच पुस्तक वाचत होती...

सहज बोलता बोलता स्पृहा ने.. तिला त्या पुस्तकाबद्दल विचारले"

"दीप्ती कोणते पुस्तक आहे,खूप इंटरेस्टिंग आहे का?नाही म्हणल तू गेली तीन चार दिवस तेच पुस्तक वाचतेय स.. "स्पृहा

अग आहेच इंटरेस्टिंग इतके ते"दीप्ती

हो का मग मला पण वाचलेच पाहिजे"स्पृहा,.

हो वाच की"आणि ते पुस्तक दीप्ती न स्पृहाला दिलं..

"एक ती".... छान नाव आहे पण कोणी तरी बिचारा प्रेमात हरला असणार..

ते पुस्तक घेऊन स्पृहा म्हणाली ...चल मी ते संध्याकाळी वाचते

रात्री जेवण झाल्यावर स्पृहा ने पुस्तक वाचायला घेतले..

ती लेखकाचे नाव शोधू लागली पण लेखकाचे नाव कुठेच न्हवते..

त्यामुळे स्पृहा च इंटरेस्ट वाढत गेला....

स्पृहा ने पुस्तक वाचायला सुरुवात केली..

पुस्तक वाचत असताना नकळत पणे ती विचार करत होती...की पियूष आणि राधा दोघांच्या जीवनाच्या आपल्याशी किती संबंध आहे...कारण त्या पुस्तकातील प्रत्येक घटना स्पृहा आणि पियूष जगले होते...ती वाढदिवसाची कविता पाहून आता तर स्पृहाला खात्रीच पटली की तो निनावी लेखक पियूष च आहे..

पुस्तक वाचत असताना त्या पुस्तकातील एक एक बारीक बारीक घटना ती जगत होती.. पियूषला काय त्रास झाला असेल याचा विचार ती करत होती.. नकळतपणे तिच्या डोळ्यातून अश्रु वाहत होते.,. तेवढ्यात तिथे दीप्ती आली.

"स्पृहा काय झाल अजुन झोपली नाहीस होय.. आणि हे काय रडतेस का तू?"दीप्ती

स्पृहा ने त्या पुस्तकाकडे बोट दाखवले..

"अग वेडा बाई एवढी इंटरेस्टिंग स्टोरी आहे ती खरच मला पण सुरवातीला त्या लेखाबद्दल जरा वाईट वाटल.. पण म्हणून काय असं रडायचं होय.. "दीप्ती

स्पृहा ने तिला फोन मधील एक फोटो दाखवला पियूष ने तिला पाठवलेली कविता होती ती...

दीप्ती काय समजायचं ती समजून गेली...

अग पण स्पृहा ही राधा कोण?आणि तिचा तूच्याशी काय संबंध..

दीप्ती माझंच निक नेम राधा आहे हे फकत पियूषला माहित होत.

स्पृहा तुला माहित आहे ना पियूष किती वेडा झालाय तुझ्यासाठी

हो ग दीप्ती मला हेच तर नको होत ना...आम्ही नाही कधी एकत्र येऊ शकत आणि यातून त्यालाच त्रास होईल,हे मला माहीत होते.. त्या वेड्याने मला त्याची सवय बनवून घेतलं.. फक्त माझ्या शिवाय त्यानं जगायला शिकवं म्हणून मी त्याच्या पासून लांब आले...मनाच्याविरुद्ध"हे सगळे बोलताना. मात्र स्पृहाचे डोळे पाणावले होते ..

तिला राहून राहून पियूष आठवत होता...एक एक क्षण ती आठवत होती.. पियूष च बोलण,त्याचं तिच्यासाठी असणारे प्रेम समजून घेत होती ती

स्पृहा,स्पृहा शांत हो आधी तू..."दीप्ती

स्पृहा कदाचीत प्रेम हे असेच असत...काही वेळेला नेमके आपल्याला हवं तेच मिळत नसत..

स्पृहा लकी आहेस तू एवढा प्रेम करणारा आणि तुझी काळजी घेणारा मुलगा तुझ्या आयुष्यात आला..

"दीप्ती कदाचित राधा हे नावाचं शापित आहे...आणि या ना वा बरोबरच त्याग माझ्या नशिबात लिहलेला असेल"स्पृहा..

ए वेढा बाई एवढंच आहे तर एकदा बोल मग पियूष सोबत.. दोन वर्षे झालीत तरी पण अजून तो तुझीच वाट बघतोय...एकदा बोल त्याच्याशी..... बोलशील ना?"दीप्ती

स्पृहा ने मानेनेच हो सांगीतलं...

बरं आता डोळे पुस आणि उद्या कॉल कर त्याला...नाही तुझ्या एका कॉल ची वाट बघतोय... आणि झोप आता ..

दुसऱ्याच दिवशी आदिती पण पियूषला भेटायला गेली..

पियूष अरे काय ही अवस्था करून घेतलीय तू...आणि ही राधा.. कोण ?

पियूष समोर बघताच तिने प्रश्नांची सरबत्ती सुरू केली..

राधा कोण म्हणजे?पियूष

अशी कोणतीच राधा तुझ्या क्लास मध्ये न्हवती!बरोबर ना!

हे ऐकुन मात्र पियूष हसू लागला.. हसता हसताच नकळत डोळ्यांत पाणी आले त्याच्या.. आदि माझी राधा कोनलाच समजली नाही कधी ना ती कधी समजेल..

तेवढ्यात पियूषला कोणाचा तरी कॉल आला..

एक अनोळखी नंबर होता..

हॅलो हॅलो कोण बोलतेय...पण समोरून आवाज आलाच नाही.. आवाज येत होता तो फकत आस्पश्ट हुंदक्यांचा...

असेच दोन तीन सेकंद गेली असतील पण तीच दोन तीन सेकंद पियूषला फार मोठी वाटत होती...

हॅलो राधा,राधा माझ्याशी बोलना प्लीज एकदा बोल ..

जी अवस्था स्पृहा ची होती तीच पियूष ची पन

बोलायचं तर खूप होत पण त्यांचा आवजच फुटत नव्हता..

पियूष अरे शांत हो आधी आणि तिच्याशी बोलणार आहेस का असेच रडत बसणार आहेस तू"आदिती

तेवढ्यात समोरून आवाज आला

“कसा आहेस तू?काहीसा आवाजात क्षीण पना होता..

पियूष ने उत्तर दिले”तू कशी आहेस”

मी ठीक आहे.. पण तू असा वेड्या सारख का वागतोय ?का त्रास करून घेतोय स्वतःला ?नको रे माझी एवढी काळजी करू!जरा स्वतःसाठी पण जगायला शिक…”स्पृहा…

“राधा मला माहित नाही का ते पण सतत तुझी काळजी वाटते.. सतत तुझीच आठवण असते.. मला माहित आहे आपण कधीच एकत्र नाही येऊ शकत…. तू मला फसवशिल पण तुझ्या मनाच काय…जी ओढ माझ्या मनात होती तीच ओढ तुझ्या पण डोळ्यात मला दिसली होती…मग तू मन मारून का जगतेयस…….. ?”पियूष

पियूष काही प्रश्नांना खरच उत्तर नसतात.. आणि ती आपण न शोधलेली बरी…मी जरी तुझा भूतकाळ असले. तरी तु भविष्य काळा कडे बघ…विसरून जा कोणी तरी राधा भेटली होती तुला ते…. माझ्या वर प्रेम केलस ना मग हवी तर माझी एक इच्छा समज आणि मला विसरून जा…. आणि स्वतःला त्रास करून नको घेऊ…”स्पृहा……

ओके राधा मी ऐकिन तुझ.. जर तुझी हीच इच्छा असेल तर मी कायमचा निघून जाईल तुझ्या आयुष्यातून कायमचा.. पण म्हणून असं समजू नको की मी तुला विसरून जाईल.. आपली सावली का कोण सोडून देत?.. ”पियूष

पियूष अरे प्रेम सोडून सुध्दा आयुष्य असत.. त्याचा विचार कर जरा तू”स्पृहा

“राधा मला जाता जाता एक बोलायचय.. ”पियूष

बोल”स्पृहा…

आदिती मात्र स्तब्ध होती. आता पियूष काय बोलतोय त्या कडे तीच लक्ष होत.. हळूच आदिती बोलत होती…

अरे रडू नकोस बाबा बोलून टाक आत्ता नाही तर परत कधी नाही...

एवढ्यात एक दीर्घ श्वास घेऊन पियूष बोलला

“आय लव्ह यू राधा. ”

हे ऐकुन राधा शांतच होती..

काही वेळाने “आय लव्ह यू टू “स्पृहा

पियूष चा फोन स्पीकर मोड वर होता..

हे ऐकुन अदितीने च त्याला आनंदाने मिठी मारली..

स्पृहाच्या त्या उत्तराचा सगळ्यात जास्त आनंद आदितीला झाला होता..

इकडे दोघांच्याही डोळ्यातून अश्रू ओघळले

पियूष पण स्तब्ध होता.. समोरून फक्त एक दीर्घ श्वास ऐकायला येत होता.. आणि सोबत होता तो काहीसा क्षीण हूं दक्यांचा आवाज येत होता....

“पियूष माझं देखील तुझ्यावर प्रेम आहे हे जरी खर असल तरी आपले रस्ते वेगळे असतील.... मला विसरून जा. ”स्पृहा

“राधा जिथं तुला माझं प्रेम समजल तिथच सगळ काही आल...प्रेम केलं म्हणजे एकत्र यावाच असं काही नाही...जिथं तुला जाणीव झाली इथच माझं प्रेम जिंकल.. नाही मी येणार तुझ्या आयुष्यात पुन्हा कधी...जिला मी शोधत होतो ती मला भेटली...काही गोष्टी असतातच अश्या. ज्या आवडल्या म्हणून आपल्या तर नाही ना होऊ शकत...खरेच आज पासून आपले रस्ते वेगळे असतील.... टेक केअर राधा...एका गोड स्वप्ना सारखी तू होतीस...पण जी सत्यात येत नाहीत तीच तर स्वप्ने असतात ना! फकत जर जीवनाच्या याच वाटेवर एखाद्या वळणावर भेटलोच तर मात्र ओळख तरी दाखव... ”पियूष

एवढे बोलून पियूष ने त्याच्या मनातील भावना ना वाट मोकळी करून दिली.....

आता पर्यंत मनात साठवून ठेवलेल्या भावना स्पृहाच्या देखील डोळ्यातून ओघळत होत्या.....

पियूष चा फोन तसाच स्पीकर मोड वर होता. स्पृहा चा देखील मुस्मुसून रडण्याचा आवाज येत होता...

शेवटी आदिती नेच फोन बंद केला...

"पियूष अरे पियूष बोलली ना तुझी राधा...ती भेटली म्हणून काय झालं.. अरे हे प्रेम असेच असत.. निस्वार्थ पणे आपण फकत देत राहायचं..."आदिती

नाही ग आदू खूप एकटं एकटं वाटतं य जरी दोन वर्षे आम्ही बोललो नाही तरी सोबतीला एक वेडी आशा होती.. ती आज नाही तर उद्या नक्की येईल आयुष्यात...आता ती उरली सुरली अशा देखील संपलीय...खूप एकटा पडलोय ग

"वेडा कुठला.. अरे उलट तू त्या राधाला जे हवय ते दिलंस.. चलं आता डोळे पुस बघू आणि असं लहान बाळासारखं रडायचं नाही.. "आदिती

थॅन्क्स आदू तुझ्या सारखी मैत्रीण भेटायला नशीब लागत आणि मी नशीबवान आहे..

बरं चल बाय आता येते मी....

अरे पियूष सगळ खर पण मला तुझ्या राधाला बघायचं आहे नक्की ती आहे कशी ती....

थांब जरा म्हणत पियूष ने तिला.. तीच फोटो फ्रेम दाखवली...तीच फोटो फ्रेम जी की राधाच्या वाढदिवसा दिवशी तीला तो देऊ शकला नाही....

आदिती एकवेळ त्या फोटो कडे पाहतच होती...ही तीच मुलगी होती जी दीप्ती सोबत तिला भेटली होती..

अरे ही तर स्पृहा ना !"आदिती

हो स्पृहा पण माझ्यासाठी माझी राधा..... अरे पण तू हिला कशी ओळखतेस ....

ते बाकी सोड ...तुला हिला भेटायचं आहे का?

हो ग आदू पण कुठे आहे ती " पियूष

ते सोड सगळ मला एक सांग तुम्ही दोघं एकमेकांना कुठे भेटला होता.. म्हणजे असं काही एखाद ठिकाण जिथं तुमच्या सगळ्यात जास्त आठवणी आहेत. "

नाही असं नाही कोणत ठिकाण!"पियूष

अरे वेडा कुठला! असं एखाद तरी ठिकाण असेल.. "आदिती

हा एक ठिकाण आहे जिथं आम्ही बराच वेळ घालवला. होता ते पण दोघांनीच"पियूष

कोणत ठिकाण पियूष"आदिती

फ्रेंड कट्टा"

आणि तारीख किंवा वेळ.. ?

थांब मला तारीख आठवत नाहीये पण वेळ मात्र संध्याकाळची होती आणि त्या वेळी केफत आम्ही दोघेच होतो...

आठवली चार एप्रिल....

अरे चार एप्रिल तर उद्याच.... "पियूष

अरे डोन्ट वरी मी आहे ना!आदिती

तिने पीयूष समोरच दीप्तीला फोन केला

“हॅलो दीप्ती एक सॉलिड न्यूज आहे !”आदिती

काय झालं आदिती ! तुला माहित आहे पियूष ची राधा कोण आहे ती.. ?”आदिती

कोण आहे ती?”दीप्ती

अग ती दुसरी कोण नाही स्पृहा च आहे…”

अग खर च होय.. ऐकंना तू काहीपण कर पण तिला उद्या घेऊन फ्रेंडस कट्टा मध्ये ये तश्या पण तुम्ही गावाला आलंय ना?आदिती

हो ग आम्ही गावाला च आलोय पण अचानक हे काय नवीन?दीप्ती..

मी सांगेन तुला निवांत पणे पण उद्या स्पृहाला घेऊन ये..

तसे पाहिले तर फ्रेंडस कट्टा सहा वाजे पर्यंत च चालू असतो पण त्या कॅफे वाल्याला आदिती ने सगळी स्टोरी सांगितली.......

प्लीज आमची मदत करा ना काका?आदिती त्या कॅफे मालकाला सांगत होती

बरं बरं काय करू मी..

जास्त काही नाही फकत आज कॅफे थोडा जास्त वेळ चालू ठेवाल का?

हो नक्की..

आदिती ने संध्याकाळी पियूषला कॉल केला..

पियूष फ्रेंडस कट्टा मध्ये ये

लगेच तिनं दुसरा फोन दिप्तीला केला..

हॅलो दीप्ती स्पृहाला फ्रेंडस कट्टा मध्ये भेटायला सांग.

दीप्ती ने पण स्पृहाला फोन केला..

अग स्पृहा फ्रेंडस कट्टा मध्ये येतेस का?दीप्ती

आत्ता?स्पृहा

हो ग म्हणजे आदिती भेटली आहे ती म्हणली तुला भेटायचं म्हणून !जमेल ना तुला!"दीप्ती

बरं ठीक आहे मी भेटते तुम्हाला.. "अस बोलून स्पृहा ने फोन ठेवला... भर उनहाळ्यातही त्या दिवशी आभाळात ढग दाटून आले होते.. नुकतीच वळीव पावसाला सुरुवात झाली होती..

आता पर्यंत पियूष फ्रेंडस कट्टा मधे पोहचला होता.. पण कॅफे त कोणीच नव्हतं फकत तो कॅफे चा मालक होता.... त्यातच लाईट सुध्दा गेली होती.. फकत एक दोन कँडेल चालू होत्या

पियूष पुर्ण पणे भिजला होता...पावसाने आणि राधाच्य आठवणीने ...तीच तारीख आणि तोच वेळ,तोच कॅफे सगळ काही त्याला आठवत होत.. दोन वर्षांच्या आधी इथेच राधा आणि तो भेटले होते प्रोजेक्ट वर्कसाठी...

राधाच्या आठवणीने पियूष अगदी वेडावला..

तो तसंच त्याच टेबल वर बसला जिथं ते दोघे बसले होते..

बराच वेळ झाला होता. पण अजून आदिती आली नाही हे बघून पियूष ने तिला कॉल केला पण तिचा फोन स्विच ऑफ होता..

खर तर दीप्ती आणि आदिती पूर्वीपासूनच त्या कॅफे मध्ये आल्या होत्या पण त्या एका बाजूला अंधारात लपल्या होत्या कोणाला दिसणार नाहीत अश्या.. आणि दोघींनीही फोन स्विच ऑफ ठेवले होते

काही कामासाठी तरी कॅफे मालक किचन मध्ये गेला होता.. तेवढयात स्पृहा तिथे आली.. कॅफेत् तर अंधार होता कोणीच न्हवत.... तिने दीप्तीला फोन केला पण तिचा फोन देखील स्विच ऑफ होता.

थोडा वेळ वाट बघून स्पृहा आत मधे आली. कॅफे मध्ये एकटा पियूष च होता.. त्याचा चेहरा भिंतीकडे होता आणि पाठ दरवाजाकडे.....

वेळ घालवण्यासाठी तो हेड फोन लावून गाणी ऐकत बसला होता..

आधी स्पृहा ने हॅलो म्हणून हाक मारली पण पियूष ने घातलेल्या हेड फोनमुळे त्याला काही ऐकूच आलं नाही.. पावसाचा जोर वाढतच होता.. तेवढयात एक वीज चमकली आणि स्पृहा घाबरून आत मधे गेली तीच लक्ष पियूष ने घातलेल्या हेड फोन कडे गेलं म्हणून मग तिने त्याच्या पाठीला हात लावून धक्का दीला...

म्हणून मग पियूष ने पाठीमागे वळून पाहिलं .....

आणि नकळत दोघांच्याही तोंडून दोघांची नावे घेतली गेली..

दो घे ही स्तब्ध उभे होते..

तेवढ्यात गेलेली लाईट आली..

दोघेही तसेच उभे होते.. नकळत पणे दोघांच्या पण डोळ्यातून अश्रु येत होते.. पण हे अश्रू होते आनंदाचे..

आज जवळ जवळ दोन वर्षांनी ते एकमेकांना भेटले होते..

राधा कशी आहेस!पियूष

मी मस्त आणि तू?राधा

तूच बघ कसा आहे ते म्हणत ते दोघे पण हसू लागले....

बघ आपण एकमेकापासून लांब जात होतो.. पण नशिबाने मात्र पुन्हा एकत्र आलो म्हणून स्पृहा हसू लागली..

पियूष बघ काही आठवत य का?"स्पृहा

एवढे म्हणून स्पृहा हसू लागली..

पियूष आठवू लागला.... असा सेम प्रसंग कुठे तरी घडलाय हे त्याला आठवत होत पण कुठे ते मात्र आठवत नव्हते.

आता मात्र तो प्रसंग आठवून त्याला हसू आले..

म्हणजे ते पुस्तक तू पण वाचलं तर?पियूष

अरे वाचले म्हणजे माझ्यासाठीच तर लिहिल होते ना तू आणि तुझ्या त्या आदिती ने हे सगळ घडवून आणलं..

तो प्रसंग पियूष नेच मुद्दाम हून त्याच्या पुस्तकात लिहला होता. त्याच्या आणि राधाच्या भेटीचा पण योगा योग असा की त्या दिवशी सगळ काही तसंच घडून आले....

दोघे पण गप्पा मारत बसले तेवढयात पियूषला एक मेसेज आला..

"अरे वेड्या मी एवढं प्लॅनिंग तुम्हाला एकत्र आणायला केलय तील प्रपोज कर"आदिती चा मेसेज होता तो..

म्हणजे आदिती हित च कुठे तरी आहे..

बोलता बोलता पियूष गंभीर झाला..

राधा मला तुला काही तरी सांगायचे आहे..

हो सांग ना?स्पृहा

आय लव्ह यू राधा .. माझ्या आयुष्यात मला वाट दाखवणारी वाटाड्या होशील.. माझी मितवा म्हणून माझ्या सोबत राहशील!" पियूष

पियूष माझं पण तुझ्या वर प्रेम आहे रे पण कदचित आपण नाही एकत्र येणार...आपण विसरून जाऊया एकमेकांना....

एवढं बोलून स्पृहा निघून गेली...

राधा राधा थांब ना एकदा थांब

पियूष तिला थांबवत होता.. पण स्पृहा थांबलीच नाही.. ती गेली......पियूष तिच्याच पाठमोऱ्या आकृतीकडे बघत होता...आणि तुला आठवले ते तिचे शब्द कदचित राधा हे नावच शापित आहे त्याला शाप आहे तो म्हणजे प्रेमाच्या त्यागाचा......

त्याने तसंच रडत रडत आदितीला कॉल केला पण तिचा फोन स्विच ऑफ होता...

घरी आल्यावर त्याने स्टेटस्ला फिलिंग अलोन असे पोस्ट केले....

आदिती ने स्टेटस् पाहिले...आणि रिप्लाय दिला..

अरे यडोबा एकटा नाहीये तू मी आहे की तुझी मितवा..

प्रेम नसल म्हणून काय झालं मैत्री तर आहे ना?"

हो ग आदू "पियूष

अरे मग आता या सगळ्यातून बाहेर पड आणि नव्याने आयुष्य जग"आदिती

चल बाय गुड नाईट"आदिती

गुड नाईट आदिती"पियूष

त्याच रात्री पियूष ने एक छान कविता लिहली आणि.. आदितीला पाठवली...

“एक मैत्रीण हवी
मला समजून घेणारी
माझ्या भावना समजून घ्यायला
शब्दांची गरज नसणारी

तीच सुख सगळ्यांशी वाटणारी
पण दुःख मात्र हक्कने माझ्याशी च वाटून घेणारी
कधी चुकलो च तर माझ्या वर रागावणारी
अन् अबोला धरणारी
पण सगळे होऊन ही स्वतः हुन बोलणारी

दोघांच्या मैत्रीत विश्वास रुजवणारी
मैत्री शब्दाचा अर्थ तिच्या
आयुष्यात असण्याने समजवणारी
जरी मी तिला विसरलो तरी मला आठवणीत ठेवणारी
जन्मभर मला सावली सारखी सोबत देणारी

शेवटी मैत्री म्हणजे काय तर?
जगातील सुंदर नाते अगदी
प्रेमापेक्षाही सुंदर असेच मला सांगणारी
एक मैत्रीण हवी.... ”
ती कविता वाचून आदिती ने रिप्लाय केला..

अरे वेडा कुठला या कवितेची गरज काय आहे?मला जरी राधा नाही होता आलं तरी तुझी मितवा बनेन की हक्काची तुझी मैत्रीण...”आदिती

Thanks आदु.... ”पियूष

नकळत का होईना पियूषच्या डोळ्यात अश्रु जमा झाले होते. त्या दिवशी त्याने आदितीला मेसेज केला.

"एक ती .. माझी स्टोरी आज खऱ्या अर्थाने पुर्ण झाली. मला वाटलं नव्हतं त्या स्टोरी चा असा शेवट असा होईल

मी जीला शोधत होतो ती शेवटी भेटलीच मला. एक ती माझी मितवा... आणि असं पण कुठे असत. की फकत प्रेमच असावं. तुझ्या सारखी मैत्रीण असेल तर खरच. या असल्या एकटेपणाचा पण त्रास होणार नाही कधीच. फक्त आयुष्यभर अशीच सोबत रहा एक मैत्रीण म्हणून..

राहशील ना?"पियूष

अरे बाबा मी कुठे जातेय...

आणि गेलेच तरी तुझ्या सारखा मित्र भेटणार आहे का ज्याची अजुन पण लहान मुला सारखा रडतो.. पियूष नाही रे मी कुठ जात अगदी लाईफ टाईम तुझ्यासोबत राहीन तुझी मैत्रीण बनून. "

---समाप्त---

पुस्तक म्हणजे असतं तरी काय? वाचन का करावे?

तुम्ही एकदा असा विचार करून बघा. आपल्या आजुबाजूला अंगमेहनतीची, त्रासाची, कधी कधी किळस येईल अशी तर कधी धोक्याची कामं करणारी माणसं आपण पहातो. त्यांना ती कामं का करावी लागतात? त्यांना वाटत नाही का की AC मध्ये बसून मस्त आराम करावा? पण शिक्षणाच्या अभावी त्यांना ती करावी लागतात. आणि शिक्षण म्हणजे काय? एक तर पुस्तकं वाचणं किंवा ज्यांनी पुस्तकं वाचली अशांकडून ऐकणं, पहाणं. आपल्यात आणि वर उल्लेख केलेल्या लोकांत फ़रक काय असेल तर पुस्तकांचा. आणि म्हणून म्हणतात की पुस्तकं हे गुरू, मित्र आणि मार्गदर्शक असतात. पुस्तकांवर प्रेम करा. वाचा. आत्मसात करा. तुमची जगाकडे पहाण्याची नजर बदलेल. आणि जगाची तुमच्याकडे पहाण्याची नजर बदलेल.

चला तर मित्रांनो, एक भव्य चळवळ उभारुया. आपल्या आजूबाजूला वाचक तयार करूया. यात प्रत्येकाने आपला सहभाग घेतला तर हा बाराकोटींचा महाराष्ट्र जगातला सर्वोत्कृष्ट अभिरुचीपूर्ण वाचकांचा प्रदेश बनायला वेळ लागणार नाही.

आम्ही बि घडलो

तुम्ही बि घडाना

वाचनाने माणूस सर्वार्थाने श्रीमंत होतो.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.